Rs 28/-

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

**समितीने सावंतवाडी नगरपरिषद, अलिबाग नगरपरिषद, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी / कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल**

# पाचवा अहवाल

**(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी सादर करण्यात आला)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, नागपूर

डिसेंबर, २०१०

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

समितीने सावंतवाडी नगरपरिषद, अलिबाग नगरपरिषद, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी / कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल

## पाचवा अहवाल

एचबी-१८५७-१३

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य:**

*(२) प्रा.वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा. वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

**(१३) रिक्त

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. म.मु.काज, उप सचिव

(३) श्री. ला.ना.जाधव, अवर सचिव (समिती)

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

---

टीप :-*(१) श्री.आनंदराव गेडाम, वि.स.स. यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीवर समिती प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर प्रा.वसंत पुरके, वि.स.स. यांची दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**(२) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० रोजी नियुक्ती झालेली असल्याने जागा रिक्त.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२००८-२००९)

**समिती प्रमुख**

(१) श्री.म.ना.बरोरा, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.तुकाराम बिरकड, वि.स.स.

(३) श्री.शशिकांत शिंदे, वि.स.स.

(४) श्री.रमेश चौधरी, वि.स.स.

(५) श्री.सुरेश इंगळे, वि.स.स.

(६) *रिक्त

(७) श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.

(८) श्री.बबनराव घोलप, वि.स.स.

(९) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.

(१०) डॉ.संदिप धुर्वे, वि.स.स.

(११) श्री.राजकुमार पटेल, वि.स.स.

(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) श्री.दिलीपराव सोनावणे, वि.प.स.

(१४) श्री.वसंत पवार, वि.स.स.

(१५) श्री.परशुराम उपरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विजय दि.जोशी, उप सचिव

(३) श्री. ज्ञा.न.माहुरे, समिती अधिकारी

(४) श्री. दिलीप येवला, कक्ष अधिकारी

---

(*श्री.नितिन राऊत, वि.स.स. यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याने सदर जागा रिक्त)

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा पाचवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने सावंतवाडी नगरपरिषद, अलिबाग नगरपरिषद, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक ६ जुलै, २००८ रोजी सावंतवाडी नगरपरिषद, दिनांक १६ ऑक्टोंबर, २००८ अलिबाग नगरपरिषद, दिनांक ११ नोव्हेंबर, २००८ भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, दिनांक १ जुलै, २००९ पुणे महानगरपालिका, दिनांक ३ जुलै, २००९ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथील कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्द्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल **दिनांक २४ नोव्हेंबर,** २०१० रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : १ डिसेंबर, २०१०.

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# अहवाल

## नगरपरिषद, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**(एक) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचा असलेला अनुशेष व अस्थायी असलेल्या पदांबाबत कार्यवाही :—**

सावंतवाडी नगरपरिषदेमध्ये वर्ग-३ व ४ ची एकूण मंजूर पदे किती आहे त्यापैकी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव पदे किती आहेत अशी समितीने विचारणा केली असता, संबंधित नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी, यांनी वर्ग ३ मध्ये स्थायी ३५ पदे व अस्थायी २१ पदे आहेत. वर्ग ४ मध्ये स्थायी ३२ पदे व अस्थायी ७६ पदे अशी एकत्र वर्ग-३ व ४ ची मिळून १६४ पदे आहेत. वर्ग ३ संवर्गामध्ये ७ टक्केप्रमाणे एकच आरक्षण आहे. हे आरक्षण वर्गनिहाय असल्यामुळे एकाच पदाचा अनुशेष आहे. लिपिक-टंकलेखक या संवर्गामध्ये ३५ पैकी ७ पदे आहेत. संवर्गनिहाय अनुशेष काढला असता ७ मध्ये एस.टी. साठी एकच आरक्षण येते. लिपिक-टंकलेखक, माहिती जनसंपर्क, खरेदी पर्यवेक्षक, सहा.निरीक्षक, सहा.कर-निरीक्षक, फायरमन, सहा.मिळकत व्यवस्थापक, वाहन चालक कम ऑपरेटर, वरिष्ठ लिपिक अशाप्रकारे संवर्ग आहेत. त्यामुळे एकाकी पदासाठी आरक्षण लागू नाही असे समितीला सांगितले.

समितीने अनुसूचित जमातीकरिता ७ टक्के आरक्षणानुसार वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या पदांची संख्या किती, त्यामध्ये स्थायी व अस्थायी किती, त्यापैकी आतापर्यंत किती पदे भरली अशी पृच्छा केली त्यावर मुख्याधिकारी यांनी दोन पदांपैकी एक पद भरले आहे. स्थायी पदांना आरक्षण ठेवावे, अस्थायी पदांना आरक्षण ठेवू नये असे संचालकांकडून पत्राद्वारे कळविण्यात आले आहे असे समितीला सांगण्यात आले. प्रकल्प अधिकारी, पेण यांना संचालकांनी कोणत्या आधारावर अशाप्रकारे पत्र दिले आहे, अस्थायी पदे केव्हापासून अस्तित्वात आहेत. लेबर ॲक्टमधील तरतुदीनुसार एखाद्या कर्मचाऱ्याने ९० दिवस काम केले तर ते पद स्थायी होते. संचालकांनी दिलेल्या पत्रानुसार खात्री करुन घेऊन त्याप्रमाणे पदे भरण्याची कारवाई करण्यात येईल अशी समितीला माहिती दिली.

वर्ग-३ मध्ये स्थायी ३५ पदांनुसार अनुसूचित जमातीच्या २ रिक्त जागा आहेत. रिक्त पदे भरण्याकरिता आपण कोणकोणती उपाययोजना केली आहे, जाहिरात दिली आहे काय, वर्ग ४ मध्ये एकूण ३२ पदे आहेत त्यामध्ये २ पदांचे आरक्षण असले पाहिजे अशी समितीने विचारणा केली त्यावर प्रकल्प अधिकारी यांनी वर्ग-३ मध्ये ३५ स्थायी पदे आहेत व २१ अस्थायी पदे आहेत. दोन्ही मिळून ५६ पदे होतात. वर्ग-४ मध्ये ३२ स्थायी पदे आहेत व ७६ अस्थायी पदे आहेत. एकूण १०८ पदे होतात. ७ टक्केप्रमाणे ११ पदांचे आरक्षण येते. याठिकाणी स्थायी व अस्थायी पदांना मानधन दिले जात नाही. अतांत्रिकपदातील वर्ग-४ मध्ये २८ स्थायी पदे आणि ६६ अस्थायी पदे मिळून एकूण

९४ पदे होतात. एकूण १६४ पदांपैकी १३१ पदे भरली आहेत. त्यानुसार उर्वरीत ३३ पदांमध्ये ११ पदे ७ टक्के आरक्षणानुसार अनुसूचित जमातीकरिता राखीव असली पाहिजेत. जर दोन वर्षापासून अस्थायी पदावर एखादी व्यक्ती काम करीत असेल आणि त्या व्यक्तिला वेतन दिले जात असेल तर ती त्या पदाची हक्कदार होते असे समितीला सांगितले.

शासन निर्णयानुसार किती पदे आरक्षित ठेवली पाहिजेत आणि किती पदे भरली पाहिजेत. स्थायी व अस्थायी पदे कशाप्रकारे भरली पाहिजेत याची पूर्ण माहिती दिसत नाही. ही पदे किती वर्षापासून रिक्त आहेत आणि ती पदे भरण्यासाठी आपण काय कार्यवाही केली, वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील स्थायी व अस्थायी पदे एकत्रिक करुन ७ टक्केप्रमाणे किती पदांचे आरक्षण होते आणि ते संवर्गनिहाय कशाप्रकारे आहे अशी समितीने विचारणा केली त्यावर प्रकल्प अधिकारी यांनी वर्ग ३ मध्ये ५६ पदे आहेत त्याठिकाणी ७ टक्केप्रमाणे ४ पदांचे आरक्षण पाहिजे आणि वर्ग ४ मध्ये १०८ पदे त्याठिकाणी ७ टक्केप्रमाणे ७ पदांचे आरक्षण पाहिजे. दोन्ही मिळून ११ पदांचे आरक्षण असले पाहिजे असे समितीला सांगितले.

अनुसूचित जमातीच्या दोन कर्मचाऱ्यांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले काय, वर्ग ४ मध्ये ७ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये २ अनुसूचित जमातीची पदे आहेत ही पदे आपण भरणार किंवा नाही, अशी पुन्हा पृच्छा केली त्यावर मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी जात पडताळणी समितीकडून अनुसूचित जमातीच्या दोन उमेदवाराची जात पडताळणी झालेली नाही, त्यामुळे त्यांनी जात प्रमाणपत्र सादर केले नाही. असे समितीला सांगितले.

आस्थापनेवर रिक्त असलेल्या वर्ग ३ च्या पदांपैकी उद्यान पर्यवेक्षक, तारतंत्री, चालक व प्रयोगशाळा सहाय्यक या पदांची भरती प्रक्रिया सुरू होती. या पदांपैकी उद्यान पर्यवेक्षक, तारतंत्री, गाळणी चालक या पदांसाठी जिल्हा निवड समितीकडून उमेदवारांची निवड करण्यात आलेली असून निवड केलेल्या उमेदवारांना नगरपरिषदेच्या सेवेत अनुक्रमे दि.२८.८.२००९ व दि.२०.४.२०१० रोजी नियुक्ती देण्यात आलेली आहे. प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली पात्र उमेदवारांची तोंडी परिक्षा दि.१९.०४.२०१० रोजी ठेवण्यात आलेली होती. दोन पात्र उमेदवारांपैकी एक उमेदवार गैरहजर होते व श्री.तेंडुलकर वैभवानंद पशुराम हे उमेदवार हजर होते. त्यांनी तोंडी परिक्षेच्या वेळी आपण अन्य ठिकाणी नोकरीस असल्याने सदर पदावर काम करण्यासाठी इच्छुक नाही असे सांगितल्याने मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी सदर पदासाठी निवड प्रक्रिया पुन्हा सुरुवात करण्यात यावी अशा सुचना दिलेल्या आहेत. सदर पदासाठी भरती प्रक्रिया नव्याने सुरू करण्याची कार्यवाही चालू असून माहे जून, २०१० मध्ये पद भरतीची जाहिरात देण्यात येईल. लिपिक-टंकलेखक संवर्गात अनुसूचित जमातीकरिता एक पद आरक्षित आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण येथील प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून अनूसूचित उमेदवारांची यादी मागून चालू वर्षी रिक्त होणाऱ्या स्थायी पदाच्या अनुषंगाने भरती प्रक्रिया केली जाईल.

सावंतवाडी, नगरपरिषद येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीला प्राप्त झालेल्या माहिती नुसार व बैठकीत दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने **दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली** साक्षीच्यावेळी समितीने नगरपालिका/ महानगरपालिका स्तरावर अनेक पदे अस्थायी स्वरुपात भरली जातात. नंतर त्या पदांच्या बाबतीत आवश्यकतेनुसार शासन निर्णय काढले जातात. अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स्पष्ट निदेश देणे आवश्यक आहे. अशी विभागीय सचिवांना समितीची सुचना आहे. मा.प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी अस्थायी पदे भरू नयेत अशा सूचना दिल्या आहेत. सावंतवाडी नगरपरिषदेत वर्ग-३ मध्ये ३९ पदे अस्थायी असून, वर्ग-४ मध्ये ३२ पदे स्थायी स्वरुपातील आहेत. लिपिक टंकलेखकमध्ये अनुसूचित जातीचे १ आणि वि.जा.भ.ज.चे १ पद भरलेले नाही. वर्ग-४ मध्ये अनुसूचित जमातीचे ४ कर्मचारी भरलेले आहेत. वर्ग-४ ची अस्थायी ७६ पदे भरलेली आहेत. ज्याप्रमाणे स्थायी कर्मचारी निवृत्त होतील त्यानुसार अस्थाई कर्मचाऱ्यांतून ती पदे भरली जातील. परंतु मागील दारातून प्रवेश देवून अशा प्रकारची भरण्यात आलेली पदे मान्य करता येणार नाही. असे समितीला सांगितले.

ज्या अधिकाऱ्यांनी मागील दारातुन प्रवेश देवून पदे भरली आहेत. त्यांच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे. अशा प्रकारच्या मागील दारातून प्रवेश केल्यामुळे आदिवासी लोक नोकरीपासून वंचित राहिले आहेत. मागील दाराने भरती करु नये अशा प्रकारचे निदेश समितीने दिले, त्यावर सचिव, नगरविकास यांनी समितीला असे सांगितले की, स्थायी आणि अस्थायी पदांच्या संदर्भात संचालक, नगरपालिका प्रशासन या कार्यालयाने नगरपालिकांची अ,ब,क,ड अशी वर्गवारी केलेली आहे. या वर्गवारी नुसार आकृतिबंध ठरविलेला आहे. हा आकृतिबंध ठरविल्यानंतर काही नगरपालिकांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ठरवून दिलेल्या आकृतिबंधापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्या नगरपालिकांनी स्थायी मंजूर पदापेक्षा जास्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अस्थायी पदावर दाखविले. संकल्पना अशी होती की, जस जसे स्थायी पदावरील कर्मचारी निवृत्त होतील तस तसे त्या पदावर अस्थायी पदावरील कर्मचाऱ्यांना सामावून घेतले जाईल आणि अशा प्रकारे अस्थाई पदे उत्तरोत्तर नाहीशी होतील. समितीने जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कर्नाटक सरकार विरुध्द उमादेवी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही प्रकारे बॅकडोअर एण्ट्रीने भरती करु नये असा निर्णय दिलेला आहे. तेव्हा पासून बॅकडोअर एण्ट्रीने भरती केली जात नाही. पूर्वी जसे सुरुवातीला लोकांना रोजंदारीवर घेऊन नंतर त्यांना कायम स्वरुपी सेवेत घेण्याची जी प्रथा होती ती प्रथा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर बंद झालेली आहे. तशा प्रकारची भरती यापुढे होणार नाही.

समितीने आकृतिबंध मंजूर करताना एस.सी.,एस.टी. ओ.बी.सी.,खुला वर्ग यांच्यासाठी पदांची टक्केवारी ठरवून दिलेली आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासींसाठी २२ टक्के आरक्षण आहे तर यवतमाळ जिल्ह्यामध्ये १४ टक्के आहे. त्यामुळे आदिवासींसाठी त्या त्या जिल्ह्यामध्ये असलेल्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये त्या त्या टक्केवारीनुसार आदिवासी उमेदवारासाठी आरक्षण असले पाहिजे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये आदिवासीची लोकसंख्या बऱ्यापैकी आहे. परंतु त्या ठिकाणी अनुसूचित जमाती साठी असलेली २ टक्के, ४ टक्के, ७ टक्के पदेही भरली जात नाहीत. अनुसूचित जमातीच्या जागा भरावयाच्या नाहीत अशा प्रकारे भरती करण्यास आपण परवानगी दिलेली आहे काय, अनुसूचित जमातीच्या जागा वेळोवेळी भरल्याच पाहिजेत. ज्या नगरपालिका अनुसूचित जमातीच्या जागा भरणार नाहीत त्यांचे अनुदान थांबवावे. अनुशेष का भरला जात नाही अशी संबंधीत नगरपालिकांना विचारणा केल्यानंतर उमेदवार मिळत नाही असे सांगितले जाते. वस्तुस्थिती अशी आहे की, अनुसूचित जमातीचे पदवीधर आणि पदव्युत्तर झालेले असंख्य उमेदवार उपलब्ध आहेत. ज्या ज्या जिल्ह्यामध्ये समितीने भेटी दिलेल्या आहेत तेथील अनुसूचित जमातीच्या संघटनांनी पदवीधर आणि पदव्युत्तर झालेले उमेदवारांची यादी समितीला दिलेली आहे, असे असताना अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत असे सांगणे संयुक्तिक वाटत नाही. अनुशेष भरण्याच्या बाबतीत विभागाचे सचिव निर्णय घेऊ शकतात.

महाराष्ट्रामध्ये आदिवासींची ८७ लाख लोकसंख्या आहे. एवढी लोकसंख्या असताना नगरपालिका आणि महानगरपालिकांतील अनुसूचित जमातीची पदे रिक्त आहेत. पुढील ३ महिन्याच्या कालावधीत बिंदू नामावली प्रमाणे अनुसूचित जमातीच्या जेवढ्या जागा रिक्त आहेत तेवढ्या त्या प्रमाणात भरण्यात याव्यात आणि ज्या नगरपालिका, महानगरपालिका अनुसूचित जमातीच्या रिक्त असलेल्या जागा भरणार नाहीत त्यांचे अनुदान थांबविण्यात येईल अशा प्रकारचे परिपत्रक विभागाने काढावे असे समितीने मत व्यक्त केले, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी समितीला असे सांगितले की, सन २००९ मध्ये संपूर्ण अनुशेष काढलेला असून तो भरण्याबाबत सर्व विभागांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच समिती सचिवांच्या असे ही निदर्शनास आणून देत आहे की, जेथे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची संख्या १००० असेल तेथेच मागासवर्ग कक्ष स्थापन करावा अशा प्रकारचा दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ रोजीचा शासन निर्णय आहे. जेथे मागासवर्ग कर्मचारी ५० असतील, १०० असतील तेथे देखील त्यांच्यासाठी मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यास परवानगी द्यावी. त्यामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन्यासाठी एक हजार कर्मचाऱ्यांची अट घातलेली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या संदर्भात एकत्रित जी.आर.निघतो. आदिवासी विकास विभागाच्या काही योजना सामाजिक न्याय विभागाकडून कार्यान्वित केल्या जातात. तेव्हा एक हजार कर्मचाऱ्यांची अट रद्द करुन कमीत कमी ५० मागासवर्गीय कर्मचारी

असले तरी त्यांच्यासाठी मागासवर्ग कक्ष स्थापन्याची परवानगी दिली पाहिजे. दुसरी सूचना अशी आहे की, अनुसूचित जमातीची पदे आतंरजिल्हा बदलीने भरण्याची परवानगी देऊ नये. बिंदू नामावलीनुसार अनुसूचित जमातीची पदे भरली गेली पाहिजेत. ज्या नगरपालिका, महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये आदिवासी भाग आहे अशा नगरपालिका, महानगरपालिकांना निधी देता येतो काय अशी पुन्हा विचारणा केली. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी समितीला सांगितले की, आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये येणाऱ्या नगरपालिका, महानगरपालिकांना शासनाकडून निधी दिला जातो.

सामान्य प्रशासन विभागाने शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना बिंदु नामावलीच्या संदर्भात स्पष्ट आदेश निर्गमित करावेत. अनुसूचित जमातीचा अनुशेष भरला जात नाही तोपर्यंत या लोकांकडून आलेले प्रस्ताव मंजूर करू नयेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकावी. महानगरपालिका आयुक्तांनी देखील शिक्षण विभागातील माध्यमिक विभागाच्या फाईल्स मंजुरीसाठी येतात त्यावेळी अनुशेष भरल्याशिवाय मंजुरी देऊ नये काही नगरपरिषदांमध्ये आस्थापना खर्च जास्त होत असल्यामुळे अनुसूचित जमातीची पदे भरता येत नाहीत. त्यासाठी विभागाने एक परिपत्रक काढावे. समितीने केलेल्या उक्त सुचनेप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली आहे. तरी सुध्दा काही नगरपालिका आणि जिल्हा परिषदांची विभागामार्फत तपासणी केली जाणार आहे. त्याप्रमाणे खालच्या स्तरावर स्पष्टपणे सूचना दिल्या जातील. रोस्टरच्या बाबतीत ज्यांनी चुका केल्या असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. असे प्रधान सचिव यांनी समितीला आश्वासित केले.

अस्थायी पदांच्या संदर्भात संचालकांनी काढलेल्या आदेशाबाबत अधिक खुलासा करावा अशी समितीने पृच्छा केली असता, सचिव, नगरविकास विभाग यांनी समितीला असे सांगितले की, संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी प्रत्येक नगरपालिकेसाठी आकृतीबंध ठरविला होता. त्यांनी आकृतीबंधाबाबत दि.२१.१२.२००६ रोजी आदेश काढले होते. या आदेशातील कलम ५(क) मध्ये असे नमूद केले आहे की, “स्थायी पदे रिक्त झाल्यानंतर अस्थायी पदावरील त्याच संवर्गाचा कर्मचारी रिक्त झालेल्या पदावर वर्ग करण्यात येईल.” “नगरपरिषद आस्थापनेवरील एकूण पदांचे आरक्षण संवर्गनिहाय स्थायी पदांवर राहील. त्यामुळे नगरपरिषद आस्थापनेवरील मागावर्गीयांचा अनुशेष प्रथम भरुन काढण्यात येईल.”

बिंदुनामावलीप्रमाणे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना स्थायी नेमणूक मिळाली पाहिजे. तसेच मंजूर पदांमध्ये जेवढ्या अनुसूचित जमातीच्या जागा आहेत त्या भरल्या गेल्या पाहिजेत. अन्यथा अस्थायी पदांसाठी सुध्दा आरक्षण लागू करण्यात यावे, असे समितीचे मत आहे. सचिव नगरविकास यांनी, सावंतवाडी नगरपरिषदेमध्ये लिपिक संवर्गाची २० पदे मंजूर केली आहेत. परंतु प्रत्यक्षात

२५ लिपिक कार्यरत असल्यामुळे तेथे जे ५ लिपिक सर्वात कनिष्ठ आहेत त्यांना अस्थायी म्हणून गृहित धरले आहे. त्यांना कमी करता येत नसल्यामुळे २० पदे स्थायी व ५ पदे अस्थायी केली आहेत. आकृतीबंध निश्चित होण्यापूर्वी या कर्मचाऱ्यांना सेवेत घेतले आहे. त्यामुळे त्यांना कमी करता येत नाही. स्थायी पदे जसजशी रिक्त होतील त्या जागेवर अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायी पदावर घेतले जाईल. असे समितीला सांगितले. जादा कर्मचाऱ्यांना अस्थायी म्हणून नेमणूक देऊन संचालकांनी किंवा शासनाने माणुसकी दाखविली आहे, त्यामुळे आता अस्थायी पदांमध्ये सुध्दा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना सेवेत सामावून घेतले पाहिजे. ही बॅक डोअर एन्ट्री आहे त्याला समितीचा विरोध आहे. म्हणून अस्थायी पदावर उमेदवार घेत असताना सुध्दा आरक्षण लागू केले पाहिजे. त्यामुळे आता जी अस्थायी पदे आहेत त्यामध्ये जर अनुसूचित जाती व जमातीचे पदे नसतील तर त्यामध्ये आणखी दोन पदे वाढवून अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना सामावून घ्यावे, असे समितीचे मत आहे. यावर सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी जी स्थायी पदे आहेत त्यामध्ये आरक्षण ठेवण्यात यावे याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु, जी अस्थायी पदे आहेत त्यामध्ये सुध्दा अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना सामावून घेण्यात यावे. अन्यथा अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना न्याय मिळाणार नाही. आरक्षणाच्या संदर्भात आपण काम करीत आहात त्यासाठी शासन निर्णय स्पष्ट असले पाहिजेत. जी पदे अस्थायी आहे त्यांना अनेक वर्षे अस्थायी म्हणूनच कामे करावी लागत आहेत. म्हणून अस्थायी पदांमध्ये सुध्दा आरक्षण असावयास पाहिजे, असे समितीला सांगितले.

संचालक, नगरपरिषद संचालनालय यांनी समितीला असे सांगितले की, अस्थायी पदांमध्ये ओपन संवर्गातील पदे असतील, परंतु ज्यावेळी पदे रिक्त होतील त्यावेळी रोस्टर प्रमाणे अनुसूचित जाती व जमातीची पदे भरण्यात येतील. नगर पालिका प्रशासनाचा आता असा प्रस्ताव आहे की, नगरपरिषदेमध्ये एकूण २५ पदे आहेत, आकृतिबंधानुसार त्यातील २० पदे स्थायी आहेत व उर्वरित पाच पदे अस्थायी आहेत. स्थायी पदांपैकी जे कोणी सेवानिवृत्त होतील त्यांच्या जागेवर अस्थायी पदावरील कर्मचारी स्थायी होतो. जे अस्थायी कर्मचारी आहेत ते खुल्या (ओपन) संवर्गातील आहेत अशा वेळी २० स्थायी पदांपैकी जर दोन पदे अनुसूचित जाती व जमातीसाठी आरक्षित असतील आणि त्यांच्यातील जर कोणी सेवा निवृत्त किंवा इतर कोणत्याही कारणास्तव जागा रिक्त झाल्यास त्या जागेवर अस्थायी पदांवरील खुल्या (ओपन) संवर्गातील कर्मचाऱ्यांस स्थायी पदांमध्ये रुपांतरित न करता या ठिकाणी अनुसूचित जाती व जमातीतील नवीन कर्मचाऱ्यांची भरती करावी, किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यात येईल, समितीने नगरपरिषदेमध्ये २० पदे स्थायी आहेत व पाच पदे अस्थायी आहेत. पाच अस्थायी पदे ओपन संवर्गातीलच असतात. अस्थायी पदांना नगरपालिकेने संरक्षण दिले आहे, त्यांना अभय दिले आहे. ही पाच पदे प्रतिक्षायादीवर आहेत. स्थायी पदांपैकी

पदे रिक्त झाल्यानंतर या अस्थायी पदांना स्थायी करण्यात येते. परंतु यामुळे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांवर अन्याय होतो. म्हणून आता जर पाच पदे अस्थायी आहेत तर त्यामध्ये आणखी दोन पदांची वाढ करून अनुसूचित जाती/जमातीची दोन पदे अस्थायी म्हणून घेण्यास काय हरकत आहे, असे समितीचे ठाम मत आहे.

नगरपालिका प्रशासनाने वेळीच आरक्षणाची पदे भरलेली नाहीत. सर्व नगरपालिकांनी वेळच्या वेळी सर्व आरक्षणाची पदे भरावयास पाहिजेत याबाबत आपण सर्व नगरपालिकांना सूचना दिल्या पाहिजेत असे समितीने निदेश दिले. सचिव, नगर विकास विभाग यांनी याप्रकरणी महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, स्थायी पदे व अस्थायी पदांचा मुद्दा समितीच्या समोर आहे. आपण स्थायी पदांचा अनुशेष काढलेला आहे. अस्थायी पदांचे आपण आरक्षण काढीत नाही. सावंतवाडी नगरपरिषदेमध्ये २५ पदे कार्यरत होती. आकृतिबंधानंतर त्यातील २० पदे स्थायी झाली व कनिष्ठ असलेली पाच पदे अस्थायी झाली आहेत. स्थायी पदांचा अनुशेष काढला असता अनुसूचित जमातीची दोन पदे आरक्षित होतात. २५ पदांवर आरक्षण काढले तर तीन पदे आरक्षित येतील. जशी पदे रिक्त होतील तशा प्रकारे अस्थायी पदांना स्थायी पदांमध्ये रुपांतरीत करण्यात येते. जी अस्थायी पदे आहेत ती हळूहळू स्थायी पदांमध्ये रुपांतरीत झाल्यानंतर अस्थाची पदे भरण्यात येणार नाहीत. आता २५ पदांप्रमाणे आरक्षण काढले तर शेवटी २० पदे स्थायी असल्यामुळे त्यावेळी त्यातील एक पद कमी होईल, असे समितीला सांगितले.

अनुसूचित जाती-जमातीची दोन पदे अस्थायी म्हणून भरावयाची नसतील तर आजच पाच अस्थायी पदे काढून टाकण्यात यावीत. शासनाच्या धोरणाच्या विसंगत कार्यवाही करणे चुकीचे आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे कामे व्हावयास पाहिजेत. आपण ज्या अस्थायी पाच पदांना सहानुभूती दाखवित आहोत त्या दृष्टीकोनातून अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना सहानुभूती दाखविली पाहिजे, अशी समितीने विचारणा केली. त्यावर या प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन्ही विभागांचे अभिप्राय मागविण्यात येऊन त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सचिव, नगरविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**(१) नगरपरिषद, सावंतवाडी या कार्यालयात वर्ग-३ व ४ मध्ये अस्थायी स्वरुपाची पदे मोठ्या प्रमाणात भरण्यात आली आहे. तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये एकूण १६४ पदांपैकी १३१ पदे भरण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी शासन निर्णयानुसार किती पदे आरक्षित ठेवण्यात आली आहेत याची परिपूर्ण आकडेवारी दिसून येत नाही. म्हणजेच नगरपरिषद कार्यालयात मागील दाराने पदे भरण्यात आली आहे, असे समितीचे मत आहे. ज्या अधिकाऱ्यांनी मागील दारातून (Back door Entry) वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना प्रवेश दिलेला आहे त्यामुळे आदिवासी**

जमातीतील उमेदवार नोकरीपासून वंचित राहिले आहेत. तेव्हा नगरपरिषद कार्यालयातील मागील दारातून भरती करण्यात आलेल्या वर्ग-३ व ४ मधील कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व केलेल्या चौकशीनुसार नगरपरिषद कार्यालयात स्थायी व अस्थायी पदे किती आहेत त्यापैकी अनुसूचित जमातीसाठी किती पदे राखीव ठेवण्यात आली आहे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) संचालक, नगरपालिका प्रशासन या कार्यालयाने नगरपालिकांचा आकृतीबंध ठरविलेला आहे. त्यानुसार नगरपालिकांची अ,ब,क,ड अशी वर्गवारी केलेली आहे. परंतु, ठरविण्यात आलेल्या आकृतीबंधापेक्षा नगरपालिकांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. नगरपालिका आणि महानगर पालिकांमध्ये त्या त्या जिल्ह्यातील अनुसूचित जमाती करिता ठरवून देण्यात आलेल्या टक्केवारीनुसार आदिवासी उमेदवारांचे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. ज्या नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जमातीचा शिल्लक असलेला अनुशेष भरला जात नाही अशा नगरपालिका आणि महानगरपालिकेचे अनुदान थांबविण्यात यावे, असे समितीचे मत आहे.

महाराष्ट्र राज्यात आदिवासींची लोकसंख्या ८७ लाख एवढ्या मोठ्या प्रमाणात असतांना नगरपालिका आणि महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीची पदे रिक्त आहेत. रिक्त असलेली पदे बिंदुनामावली प्रमाणे भरण्यात यावी. नगरविकास विभागाकडून राज्यातील सर्व नगरपालिका व महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा पुन्हा आढावा घेण्यात यावा व त्यानुसार अनुसूचित जमातीसाठी व इतर वर्गासाठी रिक्त असलेली पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे किंवा नाही याबाबतची तपासणी करावी व ज्या नगरपालिका आणि महानगरपालिका अनुसूचित जमातीच्या रिक्त जागा भरणार नाहीत अशा संबंधित नगरपालिका व महानगरपालिकांचे अनुदान थांबविण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(३) राज्य शासनाच्या जिल्हानिहाय कार्यरत असलेल्या मुख्य कार्यालयात मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची संख्या १००० व त्यापेक्षा जास्त असेल तेथेच मागासवर्ग कक्ष स्थापन करावा अशा प्रकारचा दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ रोजीचा शासन निर्णय आहे. समितीचे असे मत आहे की, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या संदर्भात एकत्रित शासन निर्णय काढण्यात येत असल्याने आदिवासी विकास विभागाच्या काही

योजना सामाजिक न्याय विभागाकडून कार्यान्वित केल्या जातात. त्यामुळे मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यासाठी असलेली कर्मचाऱ्यांची संख्या १००० असावी ही अट रद्द करून ज्या कार्यालयात मागासवर्ग कर्मचाऱ्यांची संख्या ५० व त्यापेक्षा कमी असेल अशा कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन करणेबाबत निकष ठरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(४) अस्थायी पदांच्या संदर्भात संचालकांनी दिनांक २१ डिसेंबर, २००६ रोजी काढलेल्या आदेशानुसार प्रत्येक नगरपालिकेसाठी आकृतीबंध ठरविला आहे. या आदेशातील कलम ५(क) अन्वये, "स्थायी पदे रिक्त झाल्यानंतर अस्थायी पदावरील त्याच संवर्गाचा कर्मचारी रिक्त झालेल्या पदावर वर्ग करण्यात येईल " असे नमुद केले आहे. त्यामुळे नगरपरिषद आस्थापनेवरील मागासवर्गीयांचा अनुशेष प्रथम भरुन काढण्यात येत असेल, तर बिंदुनामावली प्रमाणे मंजूर असलेल्या एकूण पदांमध्ये आरक्षित टक्केवारी नुसार अनुसूचित जमातीच्या जागा भरण्यात याव्यात. अन्यथा अस्थायी पदांकरीता सुध्दा आरक्षण लागू करण्यात यावे, असे समितीचे मत आहे. सावंतवाडी नगरपरिषदमध्ये घेण्यात आलेल्या जादा कर्मचाऱ्यांना अस्थायी म्हणून दिलेली नेमणूक ही मागील दारातून करण्यात आलेली आहे. त्यास समितीचा विरोध असल्यामुळे अस्थायी पदावर उमेदवार घेत असतांना सुध्दा आरक्षण लागू असले पाहिजे. नगरपरिषदेमध्ये २० पदे स्थायी व ५ पदे अस्थायी आहेत. अस्थायी पदे ही खुल्यावर्गातील आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांवर अन्याय होतो. म्हणून अस्थायी असलेल्या पदांमध्ये अनुसूचित जाती/जमाती वर्गातील दोन पदांची वाढ करण्यात यावी. असे समितीचे मत असून शासनाच्या धोरणाच्या विसंगत कार्यवाही करणे चुकीचे आहे. त्यामुळे अस्थायी म्हणून ठेवण्यात येत असलेल्या पदांबावत साक्षीच्या वेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग व आदिवासी विकास विभागाचे अभिप्राय मागवून या प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(५) जिल्हापरिषद व महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागातील (माध्यमिक) पदे मंजुरीसाठी सादर करण्यात येत असतांना अनुसूचित जमातीचा अनुशेष भरल्याशिवाय पदांना मंजुरी देण्यात येऊ नये, बिंदुनामावली प्रमाणे ज्यांनी पदे भरलेली नाहीत अशा नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषदांची सामान्य प्रशासन विभागामार्फत तपासणी करण्यात यावी व तपासणीनुसार बिंदुनामावली प्रमाणे पदे न भरल्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

## नगरपरिषद, अलिबाग, जि. रायगड

### (दोन) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती व अनुशेष :—

नगरपरिषद, अलिबाग या कार्यालयातील अतांत्रिकपदांमध्ये अनुसूचित जमातीकरिता किती पदे राखीव आहेत अशी विचारणा केली त्यावर प्रभारी मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी वाहक या संवर्गामध्ये अनुसूचित जमातीकरिता एकच पद राखीव आहे. वर्ग ३ मध्ये एकुण मंजूर पदे २२ असून त्यापैकी १७ पदे भरली आहेत, उरलेली ५ पदे रिक्त आहेत. फायरमनची ४ पदे रिक्त आहेत. त्या पदाची निवड प्रक्रिया सुरू आहे. वर्ग ३ मध्ये १ पद भरले आहे आणि १ पद भरु नका असे शासनाने आदेश दिले आहेत. ते पद राज्य स्तरीय संवर्गामध्ये समाविष्ट झाले आहे. रिक्त पदे संचालकांमार्फत भरण्यात येतील. एकूण ५ पदे ओपन कॅटॅगरीतील व एकाकी असल्यामुळे त्यांना आरक्षण लागू नाही असे समितीला सांगितले. अनु.जमातीच्या आरक्षित टक्केवारीनुसार वर्ग-३ मध्ये एकुण मंजूर २२ पदांपैकी ९ टक्क्यांप्रमाणे पदे भरणे आवश्यक होते, त्यानुसार अनुसूचित जमातीची किती पदे भरली आहेत, वर्ग ३ मध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षण ठेवले आहे काय, प्रत्येक संवर्गामध्ये एकाकी पद ठेवले आहे. याठिकाणी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे हक्क डावलून इतरांची भरती केली आहे, त्यांना त्यांचे हक्क का दिले नाहीत, अशी विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी लिपिक संवर्गामध्ये एकूण ७ पदे आहेत, त्यामध्ये अनूसुचित जमातीसाठी १ पद आहे. वर्ग ३ मध्ये फायरमनसाठी १ पद आहे. दुसरी १० पदे आहेत त्यामधील एक किंवा दोन पदे प्रत्येक संवर्गामध्ये आहेत. त्यांना ९ टक्के आरक्षण लागू नाही. एकूण २२ पदांमध्ये ९ टक्क्यांप्रमाणे ३ पदे अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाली पाहिजेत. **एक किंवा दोन पदांसाठी आरक्षण लागू होत नाही. याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल असे समितीला सांगितले. समिती आपणास असे निदेश देते की, आपण एक महिन्याच्या कालावधीमध्ये ९ टक्क्यांप्रमाणे आरक्षित असलेली पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करून समितीला अहवाल सादर करावा.**

वर्ग ४ मध्ये ३१ पदांपैकी किती पदांना आरक्षण आहे आणि किती पदांचा अनुशेष आहे, एस.टी.साठी ९ टक्के वेगळे आरक्षण आहे. ६ पदांपैकी २ पदे भरली आहेत व ४ जागा रिक्त आहेत. त्या भरण्यासाठी आपण जाहिरात दिली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी वर्ग ४ मध्ये ३ पदे आहेत, त्यापैकी एकच पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित आहे. १ शिपायाचे पद भरले आहे. त्याची जात पडताळणी झाली आहे. दुसऱ्या पदाची भरती प्रक्रिया सुरू आहे. एक पद फायरमनकरिता राखीव ठेवले आहे. त्यापैकी १ जागा अनुसूचित जातीसाठी आणि १ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवली आहे असे समितीला सांगितले. **समितीने ९ टक्क्यांप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी ६ जागा आहेत, त्यापैकी २ जागा भरल्या आहेत, राहिलेल्या ४ जागा आपण केव्हा भरणार आहात, अनुसूचित जमातीची वर्ग ३ मधील २ आणि वर्ग ४ मधील २ अशी एकूण ४ पदे त्यांची जात पडताळणीची तपासणी करून भरण्यात यावी व त्याबाबतचा समितीला अहवाल सादर करावा, असे निदेश दिले.**

नगरपरिषद, अलिबाग येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने अनुसूचित जमातीची रिक्त असलेली पदे भरणेबाबत दिलेल्या निदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत **दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली** साक्षीच्या वेळी समितीने अलिबाग नगरपरिषदेतील वर्ग-३ मध्ये २२ पदांपैकी अनुसूचित जमातीची किती पदे भरली आहेत, अशी विचारणा केली असता सचिव नगरविकास विभाग यांनी नगरपरिषदेत मंजूर स्थायी वर्ग-३ च्या २२ पदांपैकी १८ पदे सरळसेवेची आहेत. त्यामध्ये ११ संवर्गाची एकाकी पदे मंजूर आहेत. उर्वरित ७ पदे लिपिक टंकलेखक संवर्गाची असून त्यामध्ये टक्केवारीनुसार अनुसूचित जमातीचे एक पद आरक्षित आहे. एकाकी पद असल्यामुळे आरक्षण लागू नाही, असे समितीला सांगितले. समितीने ११ संवर्गाची एकाकी पदे मंजूर आहेत. या ११ पदांना आरक्षण लागू नाही काय, ५ पदे असतील तर त्यामध्ये एका पदाला तरी आरक्षण असणे आवश्यक आहे. एकाकी पदांबाबतचा शासन निर्णय आहे काय, अशी विचारणा केली असता त्यावर सचिव नगर विकास विभाग यांनी ही ११ पदे वेगवेगळ्या स्वरुपाची आहेत त्यामुळे त्यांना आरक्षण लागू नाही. त्यांची शैक्षणिक पात्रता सारखी असेल, पे-स्केल सारखे असेल तर त्या पदांना आरक्षण लागू करता येते. परंतु यामध्ये उद्यान पर्यवेक्षक, अग्निशमन वाहन चालक, अशी वेगवेगळ्या स्वरुपाची एकाकी पदे आहेत. त्यामुळे या पदांना आरक्षण लागू करता येत नाही. असे समितीला सांगितले. समितीने २५ पदे एकाकी असतील तर त्या पदांना आरक्षण लागू होणार नाही काय अशी पुन्हा पृच्छा केली त्यावर प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी एखाद्या संस्थेमध्ये किती पदे एकाकी ठेवावयाची, याबाबत निकष ठरविणे आवश्यक आहे. १०० पदांना १२ पदांचे आरक्षण लागू होते त्यामुळे ०८ पदे असतील तर त्यातील एक पद राखीव ठेवण्यास हरकत नाही. १५ पदे असतील त्यामध्ये दोन पदे आरक्षित ठेवण्यात यावीत, याप्रमाणे कायद्यात तरतूद करण्याची आवश्यकता आहे असे समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**नगरपरिषद, अलिबाग या कार्यालयात वर्ग-३ मध्ये एकुण २२ पदे मंजूर आहेत. त्यातील १८ पदे सरळसेवेने भरली आहे. एक पद राज्यस्तरीय संवर्गातील असल्याने ते शासनाकडून भरण्यात येणार आहे. वर्ग-३ मधील एक फायरमनचे पद भरण्यात आले आहे. उर्वरित ३ पदे शिल्लक आहे. सरळ सेवेने भरण्यात आलेल्या १८ पदांपैकी ११ पदे एकाकी संवर्गात मंजूर आहेत. व उर्वरित ७ पदे लिपिक-टंकलेखक संवर्गातील आहेत. या कार्यालयातील एकूण मंजूर २२ पदांपैकी ९ टक्केप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यात आलेली नाही असे समितीचे मत असून प्रत्यक्षात एकूण मंजूर पदांपैकी नगरपरिषद कार्यालयात अनुसूचित जमातीची किती पदे भरण्यात आली आहेत याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी. तसेच ज्या ठिकाणी बिंदुनामावली प्रमाणे १०० पदांना १२ पदांचे आरक्षण लागू होते. त्याठिकाणी १५ पदे असतील तर त्यामध्ये दोन पदे आरक्षित ठेवण्यात यावी. त्याप्रमाणे एखाद्या कार्यालयात संवर्गनिहाय किती पदे एकाकी ठेवण्यात यावी. याबाबतचे निकष ठरवून त्याप्रमाणे कायद्यात दुरुस्ती करणेही आवश्यक आहे. याबाबत नगरविकास व संबंधित विभागाने एकत्रितरित्या कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

एचबी-९८५८-२अ

## भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका

**(तीन) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचा असलेला अनुशेष व जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणीबाबत कार्यवाही :-**

भिवंडी- निजामपूर शहर महानगरपालिका २००१ मध्ये स्थापन झाली आहे. या ७ वर्षांच्या कालावधीत महानगरपालिकेने बऱ्याच नेमणूका केल्या आहेत. त्या कोणत्या नियमाने केल्या आहेत. यासाठी कोणती पध्दत अवलंबविण्यात आली आहे. महानगरपालिकेतील विविध पदावर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी महानगरपालिकेने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय असल्यास केव्हा, अशी समितीने विचारणा केली. महानगरपालिकेतील विविध पदावर उमेदवाराच्या नियुक्त्या करण्यासाठी सेवा प्रवेश नियम तयार करुन दिनांक १.७.२००६ अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्यास शासनाकडून अद्याप मंजुरी मिळाली नाही. दरम्यानच्या कालावधीत शासन परिपत्रक दिनांक २.७.२००८ नुसार मॉडेल सेवाप्रवेश नियम तयार केले आहेत. त्यावर हरकती व सूचना मागवून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावे असे निर्देश आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियम तयार केले असून महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव ठेवण्यात येत आहे व शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेले आहे अशी आयुक्त महानगरपालिका यांनी समितीला माहिती दिली.

शासनाने नवनिर्मित महानगरपालिका निर्माण केल्या त्यावेळेस महानगरपालिकांचे वेगवेगळे सेवाप्रवेश नियम अस्तित्वात होते. जोपर्यंत नवीन सेवाप्रवेश नियम तयार होत नाहीत तोपर्यंत शासनाचे जे नियम अस्तित्वात आहेत त्याप्रमाणे भरती करावी. सेवाप्रवेश नियमांसाठी भरती थांबविण्याची आवश्यकता नाही अशाप्रकारे शासनाकडून सूचना होत्या. सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबत माननीय उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने शासनाला आदेश दिले होते की, सर्व महानगरपालिकांनी एकाच प्रकारचे सेवाप्रवेश नियम ठराविक मुदतीच्या आत तयार करावेत. अशा प्रकारे तयार केलेल्या सेवाप्रवेश नियमास शासनाकडून लवकरच मंजुरी मिळेल. असेही समितीला सांगितले.

महानगरपालिकेत अनुसूचित जमातीसाठी सरळसेवेने आणि पदोन्नतीने आरक्षण किती आहे. या कार्यालयात १३१ नवीन पदे आपण भरली आहेत. भरण्यात आलेल्या एकूण पदांच्या २२ टक्के आरक्षण प्रमाणे अनुसूचित जमातीची एकूण किती पदे होतात, अशी विचारणा केली त्यावर आयुक्त यांनी सरळ सेवेत अनुसूचित जमातीसाठी एकूण ३७० पदांचे आरक्षण आहे. यामध्ये सरळसेवेने २२ टक्के असून पदोन्नतीने ७ टक्के आरक्षण आहे. असे समितीला सांगितले. दिनांक १६/०६/२००८ रोजी शासनाला मंजूर असलेल्या पदांसाठी जो अहवाल पाठविला आहे त्यात चुकीची माहिती

दिलेली आहे, असे समितीचे मत आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय सेवेत ६६३७ पदे आहेत परंतु आपण ४२७० पदांचा अहवाल पाठविला आहे. हे बरोबर आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ४३६१ पदे आहेत. त्यापैकी २५२५ सफाई कामगार असून या सफाई कामगारांना आरक्षण लागू होत नाही. उर्वरित पदांसाठी २२ टक्क्याप्रमाणे एकाकी पदे सोडून एकूण ३८० पदांचे आरक्षण येते. त्यापैकी सरळसेवेने ३७० पदांचे आणि पदोन्नतीने १० पदांचे आरक्षण येते असे समितीला सांगितले.

अनुसूचित जमातीसाठी सरळसेवेत आरक्षित असलेल्या पदांबाबत २२ टक्क्याप्रमाणे वर्ग-३ आणि ४ मध्ये आरक्षण किती येते, त्यापैकी अनुशेष किती भरला आहे आणि किती रिक्त आहे, पदे रिक्त असण्याची कारणे काय आहे, अशी समितीने पृच्छा केली असता, आयुक्त महानगरपालिका यांनी सफाई कामगार सोडून वर्ग-१ ची ३१ पदे, वर्ग-२ ची ४५ पदे, वर्ग-३ ची १११२ पदे मंजूर असून वर्ग-४ ची ६४८ पदे मंजूर आहेत. अशी एकूण १८३६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी पदोन्नतीची पदे बाजूला काढल्यावर आणि उर्वरित जी पदे राहतील त्याचे संवर्गनिहाय व एकाकी पदे असतील ती सोडून ३७० पदांचे सरळसेवेसाठी आरक्षित होतात व १० पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या पदोन्नतीसाठी आरक्षित आहेत. एकूण ३८० पदांपैकी आतापर्यंत २९७ पदे भरली आहेत. ८३ पदांचा अनुशेष शिल्लक आहे अशी समितीला माहिती दिली.

महानगरपालिकेत वर्ग-१, २, ३ आणि ४ ची एकूण किती पदे भरली आहेत, किती पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने किती पदे भरली गेली. पदोन्नतीने पदे भरत असतांना त्यांची जात पडताळणी झाली आहे काय, जात वैधता पडताळणी झाली नसल्यास त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली आहे. अशी समितीने विचारणा केली. आयुक्त, महानगरपालिका यांनी सन २००५-०६ मध्ये २५२ पदे भरली असताना त्यामध्ये ४७ आदिवासी उमेदवार भरले आहेत त्यापैकी १९ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झाली आहे. २८ कर्मचाऱ्यांची राहिली आहे. वरीलपैकी काही पदे पदोन्नतीने भरली आहेत.

जात पडताळणी अभावी २८ कर्मचाऱ्यांची प्रकरणे २००७ पासून प्रलंबित आहेत. ही प्रकरणे प्रलंबित असल्याची कारणे काय, याप्रकरणी, तीन महिन्यात जात पडताळणी झाली नाही तर नोकरीतून काढून टाकावे असा शासन निर्णय आहे अशी समितीने पृच्छा केली. आयुक्त, महानगरपालिका यांनी सदरील जातप्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविले आहे. त्यांना मुदतवाढ दिलेली नसून अशा कर्मचाऱ्यांना नोटीस दिलेल्या आहेत. आता त्यांना डिसेंबरपर्यंत जात प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मुदत देण्याची पुन्हा नोटीसा देण्यात येईल असे समितीला सांगितले. समितीने महानगरपालिकेत अनुसूचित जमातीच्या एकूण ८३ पदांचा अनुशेष आहे, त्यामध्ये वर्गनिहाय किती पदे आहेत, अशी विचारणा केली.

महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.सुभाष झळके, हेडक्लार्क यांना पदोन्नती न मिळाल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. श्री.सुभाष झळके यांना वर्ग-२ मध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक नसल्याने व सेवाज्येष्ठतेनुसार बसत नसल्याने पदोन्नती देता आली नाही. त्याचप्रमाणे श्री.भाऊराव आढळ, लिपिक यांना पदोन्नती न मिळाल्यामुळे त्यांनी माननीय अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, माननीय अध्यक्ष यांनी वरील तक्रारीबाबत सुनवाणीसाठी दिनांक २०.११.२००८ रोजी बोलावले होते. या समितीने सर्व कागदपत्राची छाननी करुन श्री.आढळ यांना सांगितले की, त्यांनी महानगरपालिकेकडे सविस्तर निवेदन सादर करावे व आयुक्त यांनी त्यांचे म्हणणे ऐकून योग्य तो निर्णय द्यावा. **तथापि, श्री. आढळ यांनी दोन दिवसांपूर्वी निवेदन सादर केले आहे. त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल.** वर्ग-१ च्या पदांचे विवरण असे आहे की, मंजूर पदे ७ असून २ राखीव आहेत, २ रिक्त आहेत. ही डॉक्टरांची पदे असून जाहिरात देऊनही डॉक्टर मिळत नाहीत. अनुसूचित जमातीसाठी सिनियर स्पेशालिस्ट, ज्युनिअर स्पेशालिस्ट, उप अभियंता, स्त्री रोग तज्ञ ही वर्ग-१ ची पदे आहेत. संवर्गनिहाय अनुशेष काढताना याच पदासाठी अनुशेष निघाला आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

अनुसूचित जमातीची पदे भरल्याशिवाय इतर पदे भरु शकत नाहीत असा शासन निर्णय आहे. नागपूर, अमरावती विभागात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जमातीचे डॉक्टर उपलब्ध आहेत, त्या विभागातील वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. तसेच विविध प्रकल्प अधिकाऱ्यांकडून माहिती मागविण्यात यावी. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना हेतुपुरस्सर टाळू नये. इतर संवर्गातील पदे भरली आहेत परंतु आदिवासींची पदे जाणूनबुजून भरलेली नाहीत त्यामुळे एकप्रकारे आपण आदिवासींवर अन्याय केलेला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीची पदे भरल्याशिवाय इतर संवर्गातील पदे भरु नयेत. असे शासनाचे आदेश असतांनाही आपण नियमांचे उल्लंघन केलेले आहे. ही पदे भरण्यासाठी आपण अप्पर आयुक्त, नागपूर, अमरावती, नाशिक यांचेकडून उमेदवारांची यादी मागविली होती काय, अशी समितीने पृच्छा केली. त्यावर आयुक्त, महानगरपालिका यांनी सन २००५ साली जाहिरात दिली होती आणि सन २००७ मध्ये काही उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली होती परंतु ते सेवेत रुजु झाले नाही. अनुसूचित जमातीची वर्ग-२ ची ४ पदे राखीव आहेत, ती चारही पदे रिक्त आहेत. वर्ग-३ ची १०१७ पदे आहेत त्यापैकी २२४ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत, त्यापैकी १६७ पदे भरली असून ५९ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची एकूण ६३७ पदे असून त्यापैकी १४० अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्यापैकी १२७ पदे भरली असून १३ पदे रिक्त आहेत. परिचारिकेची पदे २८/०२/२००६ पासून रिक्त आहेत तसेच हॉस्पिटल शासनाकडे हॅन्डओव्हर करण्याचा प्रस्ताव आहे. सदरहू प्रस्ताव मान्य झाला नाही तर ही पदे लवकरच भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सन २००७ पासून मेकॅनिकचे एक पद रिक्त आहे. अटेन्डन्टचे एक पद रिक्त आहे. दिनांक ३१/०७/२००७ पासून सेवानिवृत्तीमुळे मिडवाईफची

३ पदे रिक्त आहेत. प्लंबरचा दोन पदांचा अनुशेष आहे. ही पदे भरण्यासाठी चार-पाच महिन्यांचा कालावधी लागेल. सन २००५ मध्ये २५२ पदे भरली आहेत, त्यात ४७ पदे अनुसूचित जमातीची भरलेली आहेत. या भरतीप्रक्रियेत काही तक्रारी झाल्या. त्या अनुषंगाने चौकशी झाली. ही रिक्त पदे या वर्षी भरण्याचा प्रयत्न करु असे समितीला सांगितले. **डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत ही पदे भरण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे असे समितीने निदेश दिले असता आयुक्त, महानगरपालिका यांनी या प्रकरणी एक महिन्यात कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.**

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने **दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.** साक्षीच्या वेळी महानगरपालिकेत भरण्यात आलेली पदे व जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेल्या बाबतची माहिती समितीला खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात सादर करण्यात आली.—

भिवंडी महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ संवर्गामध्ये एकूण १८३६ पदे मंजूर आहेत. संवर्गनिहाय बिंदू नामावली सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष, कोकण विभाग यांचेकडून जुलै, २००९ मध्ये तपासून प्राप्त झाले आहे. त्यानुसार मंजूर पदे, त्यापैकी अनुसूचित जमातीचे आरक्षण, भरलेले आरक्षण व शिल्लक आरक्षण (अनुशेष) खालीलप्रमाणे आहे.—

| संवर्ग | एकूण मंजूर पद संख्या | अ.ज.साठी आवश्यक आरक्षण | अ.ज.चे भरलेले आरक्षण | अ.ज.चे शिल्लक आरक्षण (अनुशेष) |
|---|---|---|---|---|
| वर्ग १ सरळसेवा | ७ | २ | ० | २ |
| वर्ग १ पदोन्नती | १७ | १ | ० | १ |
| वर्ग २ सरळसेवा | २३ | ४ | ० | ४ |
| वर्ग २ पदोन्नती | २८ | १ | १ | ० |
| वर्ग ३ सरळसेवा | १०१९ | २२३ | १६४ | ५९ |
| वर्ग ३ पदोन्नती | ९० | ८ | ५ | ३ |
| वर्ग ४ सरळसेवा | ६४१ | १४१ | १२४ | १७ |
| वर्ग ४ पदोन्नती | ११ | १ | ० | १ |
| एकूण | **१८३६** | **३८१** | **२९४** | **८७** |

**टीप :-** वर्ग १ सरळसेवा संवर्गामध्ये प्रत्यक्षात एकूण १४ पदे मंजूर आहेत. तथापि, ७ पदे कायमस्वरुपी शासनाकडील प्रतिनियुक्तीची पदे असल्यामुळे आरक्षण काढताना प्रत्यक्षात उपलब्ध

असलेल्या ७ पदांवर आरक्षण काढण्यात आले आहे. वर्ग ३ सरळसेवा संवर्गामध्ये प्रत्यक्षात एकूण १०२४ पदे मंजूर आहेत. तथापि, ५ पदे सार्वजनिक आरोग्य परिचारीका सेवा अंतर्गत कायमस्वरुपी शासनाकडील प्रतिनियुक्तीची पदे असल्यामुळे आरक्षण काढताना प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या १०१९ पदांवर आरक्षण काढणेत आले आहे.

समितीने सूचित केल्याप्रमाणे तपासणी केली असता वर्ग-१ ची ७ पदे व वर्ग-३ ची ५ पदे कायमस्वरुपी शासनाकडील प्रतिनियुक्तीची आहे. भिवंडी महानगरपालिकेतील आस्थापनेवर खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.—

| | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वर्ग-१ | ३१ | २० | ११ |
| वर्ग-२ | ५१ | ३१ | २० |
| वर्ग-३ | १११४ | ८८३ | २३१ |
| वर्ग-४ | ६५२ | ५९७ | ५५ |
| **एकूण** | **१८४८** | **१५३१** | **३१७** |
| सफाई मुकादम | ३४ | २४ | १० |
| सफाई कामगार, स्वीपर, मेहतराणी | २४९१ | २३३९ | १५२ |
| **एकूण** | **४३७३** | **३८९४** | **४७९** |

समितीने दिलेल्या निदेशान्वये शासन निर्देशानुसार सरळसेवेने व पदोन्नतीने अनुसूचित जमातीच्या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची जात पडताळणी केल्याबाबतचा अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात आला.—

| वर्ग | एकूण अ.ज. चे कार्यरत कर्मचारी | जात पडताळणी झालेले | पडताळणी न झालेले | वैधता असलेले | वैधता नसलेले (अवैध) | समिती कडे पाठविलेले | समिती कडे न पाठविलेले | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| वर्ग-२ | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| वर्ग-३ | १६९ | १०४ | ६५ | १०२ | २ | १५ | ५० | अवैध जातप्रमाणपत्र आढळलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नियमानुसार सेवेतून कमी करण्याची कार्यवाही प्रस्तावित करणेत आली आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी अद्याप जात पडताळणी समितीकडे जात पडताळणी बाबत प्रकरण सादर केलेले नाही त्यांना त्यांचे जात प्रमाणपत्र, जात पडताळणी समितीला ताबडतोब सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. संबंधितांची जात पडताळणी पूर्ण करुन घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे. |
| वर्ग-४ | १२४ | ७८ | ४६ | ७८ | ० | ३ | ४३ | ज्या कर्मचाऱ्यांनी अद्याप जात पडताळणी समितीकडे जात पडताळणी बाबत प्रकरण सादर केलेले नाही त्यांना त्यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीला |

| वर्ग | एकूण अ.ज. चे कार्यरत कर्मचारी | जात पडताळणी झालेले | पडताळणी न झालेले | वैधता असलेले | वैधता नसलेले (अवैध) | समिती कडे पाठविलेले | समिती कडे न पाठविलेले | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | ताबडतोब सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. संबंधितांची जात पडताळणी पूर्ण करुन घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे. |
| **एकूण** | **२९४** | **१८३** | **१११** | **१८१** | **२** | **१८** | **९३** | |

महानगरपालिकेकडील इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय शासनाच्या आरोग्य विभागाकडे वर्ग करण्याचा शासन निर्णय झाला असल्यामुळे डॉक्टरांचा अनुशेष भरणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सेवाप्रवेश नियमांचा मसुदा डिसेंबर, २००९ मध्ये राजपत्रात प्रसिध्द केला असून अंतिम मंजुरीकरिता महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेच्या मंजुरीनंतर सदर सेवा प्रवेश नियमांना शासनाची मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. अशी समितीला माहिती दिली. समितीने अद्याप काही लोकांनी बायलॉज तयार केलेले नाहीत. हा ठराव आपण लवकरात लवकर लागू केला पाहिजे. येत्या सर्वसाधारण सभेमध्ये नगरपालिका व महानगरपालिकेतील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व आयुक्त यांच्या पुढे प्रस्ताव ठेवून तो मंजूर करुन द्यावा. अन्यथा त्यांचे अनुदान थांबविण्यात येईल असे पत्र त्यांना पाठवावे, असे केले तरच हा प्रस्ताव मान्य होऊ शकेल असे समितीने निदेश दिले.

तसेच महानगरपालिकेत एकूण ८७ पदांचा अनुशेष हे प्रमाण बरेच जास्त आहे अशी समितीने पृच्छा केली असता आयुक्त महानगरपालिका यांनी बायलॉज न आल्यामुळे, ही पदे मंजूर होऊ शकली नाहीत. त्यामुळे ती रिक्त आहेत. या संदर्भात हिअरिंग घेतले आहे. सूचना आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. बायलॉजच्या गॅझेटचे पब्लिकेशन जानेवारी, २०१० मध्ये केले होते. साधारणपणे जुलै महिन्यापासून बायलॉजच्या मंजुरीची प्रक्रिया सुरु होते. असे समितीला सांगितले. समितीने ही प्रक्रिया लवकर, पूर्ण करुन पदे भरण्यास सुरुवात करा. तसेच वर्ग-१ ते वर्ग-४ चे एकूण अनुसूचित जमातीचे कार्यरत कर्मचारी २९४ आहेत. त्यापैकी १८३ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली आहे. १११ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली नाही. वैधता नसलेले २ कर्मचारी आहेत.

१८ प्रकरणे समितीकडे पाठविण्यात आलेली आहेत आणि समितीकडे अद्याप ९३ प्रकरणे पाठविण्यात आलेली नाहीत. ही ९३ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे का पाठविण्यात आली नाहीत, ही प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तर त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात यावे, याबाबत १९९३ साली सुप्रीम कोर्टाने माधुरी पाटील विरुध्द इतर या प्रकरणात लॅण्ड मार्क जज्जमेंट दिलेले आहे. जात पडताळणी समितीने प्रमाणपत्राची वैधता तपासावी अशी सूचना सुप्रीम कोर्टाने शासनाला केली होती. विभागीय अतिरिक्त आयुक्तांना त्याबाबतचे अधिकार दिले होते. त्यांनतर २००४ मध्ये कायदा तयार झाल्यानंतर जात पडताळणी समितीची निर्मिती झाली. यामध्ये अनुसूचित जातीसाठी वेगळी समिती, अनुसूचित जमातीसाठी वेगळी समिती, बाकीच्या प्रवर्गासाठी वेगळी समिती निर्माण झाली. जे कर्मचारी सेवेत आहेत त्यांची जात पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी त्या प्राधिकरणाची आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांना कामावरुन काढले पाहिजे, अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय व शिफारशी :—

**(१) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत वर्ग-३ मध्ये १११२ व वर्ग-४ मध्ये ६४८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी अनुसूचित जमाती साठी आरक्षित असलेल्या टक्केवारी नुसार सरळसेवेने ३७० पदे आरक्षित आहेत व पदोन्नतीमध्ये १० पदे आरक्षित आहेत. सरळसेवा व पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या एकूण ३८० पदांपैकी २९७ पदे भरलेली असून ८३ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. साक्षीच्यावेळी भिवडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, कोकण विभाग यांच्याकडून जुलै, २००९ मध्ये बिंदुनामावली तपासून घेतली असता या कार्यालयात वर्ग-३ मध्ये एकूण ८७ पदांचा अनुशेष असल्याची माहिती दिली त्यापैकी वर्ग १-२ मध्ये एकूण ७ पदांचा अनुशेष आहे. पदोन्नतीने भरावयाच्या एकूण मंजूर असलेल्या ११०९ पदांपैकी अनुसूचित जमातीसाठी २३१ पदे आरक्षित ठेवण्यात आली आहे व त्यापैकी १६९ पदे भरण्यात आलेली असून उर्वरित अनुसूचित जमातीच्या ६२ पदांचा अनुशेष शिल्लक आहे.**

**तसेच वर्ग-४ मध्ये सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाच्या एकूण मंजूर असलेल्या ६५२ पदांपैकी अनुसूचित जमाती साठी १४२ पदे आरक्षित ठेवण्यात आली असून त्यापैकी १२४ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित १८ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. महानगरपालिकेत वर्ग-१ व २ मधील ७ पदांचा अनुशेष वगळता सरळसेवा व पदोन्नतीने वर्ग-३ मधील ६२ व वर्ग-४ मधील १८ असे एकूण ८० पदांचा असलेल्या अनुशेषापैकी वर्ग-३ व ४ मध्ये प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आली व किती पदे शिल्लक आहेत. पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) महानगरपालिकेत सन २००५-०६ मध्ये २५२ पदे भरली आहेत त्यामध्ये अनुसूचित जमातीच्या भरलेल्या ४७ आदिवासी उमेदवारांपैकी १९ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झाली आहे. उर्वरित २८ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी २००७ पासून प्रलंबित आहे. याप्रकरणी तीन महिन्यात जात पडताळणी झाली नाही तर अशा कर्मचाऱ्यांना नोकरीतून काढण्यात यावे, असा शासन निर्णय आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्राअभावी प्रलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांना डिसेंबर, २०१० पर्यंत जात प्रमाणपत्र सादर करण्याबाबत पुन्हा नोटीस देण्यात यावी व दिलेल्या अवधित संबंधित कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांच्यावर शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

(३) महानगरपालिकेत वर्ग-३ मध्ये एकूण १६९ व वर्ग-४ मध्ये १२४ अनुसूचित जमातीचे कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी वर्ग-३ मध्ये १०२ व वर्ग-४ मध्ये ७८ अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. २ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झाली परंतु, त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. अवैध असलेले जात प्रमाणपत्र आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन निणर्यानुसार त्यांना सेवेतून कमी करण्याची कार्यवाही प्रस्तावित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

(४) वर्ग-३ व ४ मधील अनुसूचित जमातीची एकूण १८ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेली आहे. जात पडताळणी समितीकडून उक्त १८ प्रकरणाच्या तपासणीस संबंधित अधिकाऱ्यांकडून विलंब झालेला आहे. प्रलंबित असलेल्या प्रकरणी जात पडताळणी समितीने त्वरीत निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

(५) महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या वर्ग ३ व ४ मधील अनुसूचित जमातीच्या एकूण ९३ कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत जात प्रमाणपत्रासंबंधीची कागदपत्रे जात पडताळणी समिती कार्यालयाकडे सादर केली नाहीत अशा संबंधित कर्मचाऱ्यांना कागदपत्रे सादर करण्यास दोन महिन्यांची नोटीस देण्यात यावी व दिलेल्या मुदतीत त्यांनी जात प्रमाणपत्राची कागदपत्रे सादर न केल्यास अशा कर्मचाऱ्यांविरुध्द शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात यावी तसेच वर्ग-३ व ४ मधील एकूण १११ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी अद्यापपर्यंत झालेली नाही अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

समितीने वरीलप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

## पुणे महानगरपालिका

### (चार) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचा असलेला अनुशेष :-

पुणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी याची मंजूर पदांची संख्या किती आहे, मंजूर पदांपैकी किती पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत,अशी समितीने विचारणा केली त्यावर उपआयुक्त महानगरपालिका यांनी वर्ग-१ मध्ये एकूण १० पदे असून, ८ पदे भरलेली आहेत आणि दोन पदे रिक्त आहेत. व वर्ग -३ मधील ४२ पदे ही वेगवेगळ्या संवर्गातील असून संगणक प्रोग्रॅमर पदासाठी फेर जाहिरात दिलेली आहे, कनिष्ठ अभियंता व सॅनिटरी इन्स्पेक्टर या पदासाठी अर्जाची छाननी सुरू असून पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येईल, आर्कि.ड्राफ्ट्समन या पदासाठी १ चा अनुशेष असून सदर पदामधील अर्जाची छाननी सुरू आहे, हार्टीकल्चरल सुपरवायझर या पदासाठी संबंधित पात्र उमेदवाराला दिनांक १ जून, २००९ रोजी आज्ञापत्र प्रसूत करण्यात आले आहे. तसेच रेडीओग्राफर व ज्युनिअर नर्स या पदासाठी वर्तमानपत्रामध्ये पुढील ८ दिवसांच्या आत जाहिरात देण्यात येणार आहे, अशी समितीला माहिती दिली.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांसाठी किती टक्के आरक्षण आहे. महानगरपालिकेने आदिवासी उमेदवारांची पदे भरण्यास विलंब लावलेला आहे. सदर पदे भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर सुरू करावी असे समितीने निदेश दिले. अतिरिक्त आयुक्त यांनी भरती प्रक्रिया गेल्या वर्षापासून सुरु झालेली असून सर्व संवर्गातील उमेदवारांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. आदिवासींची पदे भरण्याच्या संदर्भात आढावा घेण्यात आला होता. सदर भरती प्रक्रिया कमिटीमार्फत केली जात आहे. तसेच वेब ऑफसेट मशिनमन पद भरण्यासंदर्भात मुख्य सभेपुढे विषय सादर करण्यात आला असून, ते पद लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही केली जात असून दोन महिन्याच्या आत भरती प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे समितीला सांगितले.

अनुसूचित जमातीच्या संवर्गनिहाय जागा भरण्याबाबत दिलेल्या जाहिरातीमध्ये जानेवारी, २००९ पर्यंत अर्ज मागितले होते. जाहिरात देऊन अर्ज आल्यानंतर आतापर्यंत ६-७ महिने झालेले आहेत. या जागेसाठी किती अर्ज प्राप्त झाले आहेत अशी समितीने पृच्छा केली . महानगरपालिका मार्फत काही जाहिराती दिलेल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, अनुसूचित जमातीची राखीव पदे किती आहेत. व इतर संवर्गासाठी किती पदे राखीव आहेत. अशी संवर्गनिहाय एकूण पदासाठी ४५०० अर्ज आलेले आहेत. असे उपआयुक्त (सामान्य) यांनी समितीला सांगितले. ही समिती अनुसूचित

जमातीच्या कल्याणासाठी आहे. आम्ही अनुसूचित जमातीच्या उमेदवारांविषयी विचारीत आहोत. तुम्ही सांगत आहात की, जाहिरात दिली आहे. अर्जाची छाननी सुरु आहे हे उत्तर संयुक्तिक वाटत नाही असे समितीने मत व्यक्त केले. अतिरिक्त आयुक्त यांनी सर्व पदांची एकत्रित जाहिरात दिलेली आहे. यामध्ये १२ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्यामध्ये कनिष्ठ लिपिकांची पदे आहेत. एकूण ४५०० अर्ज प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमातीचे किती अर्ज आहेत हे संपूर्ण छाननी झाल्यानंतर समजेल असे सांगितले. या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांबाबत जातपडताळणी अभावी किती अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना बोगस ठरविले आहे, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे, अशी समितीने पृच्छा केली, उपआयुक्त यांनी ११ सेवकांचे जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध झाले असून, त्याबाबत कोर्टात केस चालू आहे. २ सेवकांचे जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध झाल्यामुळे शासन निर्णय १५/०६/१९९५ नुसार संरक्षण देऊन विशेष मागास वर्ग गटात त्यांना दर्शविले आहे, असे समितीला सांगितले.

पुणे महानगरपालिकेत झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्दांच्या अनुषंगाने **दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.** साक्षीच्या वेळी महानगरपालिकेत भरण्यात आलेली पदे याबाबतची माहिती लेखी स्वरुपात खालीलप्रमाणे समितीला सादर करण्यात आली.

दिनांक १/८/२००९ रोजी अनुसूचित जमाती मधील अनुशेषाच्या पदांची जाहिरात देण्यात आली आहे. जाहिरातीव्दारे प्राप्त झालेल्या अर्जामधून भरती प्रक्रिया सुरु केली असता दिनांक १/७/२००९ रोजी सरळसेवेमध्ये ४४ तांत्रिक व ५० अतांत्रिक पदांचा अनुशेष होता. त्यापैकी तांत्रिक पदांचा वर्ग ३ मध्ये ७ पदांचा अनुशेष जादा दर्शविला होता. पदोन्नतीसाठी तांत्रिक २१ व अतांत्रिक ५३ पदांचा अनुशेष दर्शविला आहे. एकूण प्राप्त १४२७ अर्जापैकी अनुसूचित जमाती गटासाठी ३६ अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी ३४ अर्ज पात्र ठरले आहेत. दिनांक २२ ते २६ फेब्रुवारी व दिनांक ०३ ते ०४ मार्च, २०१० रोजी मुलाखती घेण्यात आल्या. दिनांक १८/०४/२०१० रोजी परीक्षा घेण्यात आली. दिनांक ०७/०५/२०१० रोजी मा.मुख्य सभेकडे विषयपत्र सादर केले आहे. ज्युनिअर ग्रेड लेखनिकेच्या जाहिरातीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण ३४९५ अर्जापैकी अनुसूचित जमाती गटासाठी ३९४ अर्ज प्राप्त झाले आहे. त्यापैकी अनुसूचित जमाती गटासाठी २४० अर्ज पात्र व १५४ अर्ज अपात्र ठरले आहे.

## दिनांक ३१/५/२०१० अखेर अनुसूचित जमाती बाबत माहिती

| वर्ग | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमाती आवश्यक आरक्षण | अनुसूचित जमाती प्रत्यक्ष कार्यरत ३१/३/२००९ | अनुसूचित जमाती अनुशेष ३१/३/२००९ अखेर | अनुसूचित जमाती प्रत्यक्ष कार्यरत ३१/५/२०१० | अनुसूचित जमाती अनुशेष ३१/५/२०१० अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सरळ सेवा** | | | | | | | | |
| **भरती** | | | | | | | | |
| वर्ग-१ | २९ | २४ | ५ | १ | १ | ० | १ | १ |
| वर्ग-२ | १४३ | १२२ | २१ | १० | १० | ० | १० | १ |
| वर्ग-३ | ३५२० | ३००६ | ५१४ | २४७ | २०७ | ५६ | १९१ | ६२ |
| वर्ग-४ | ४८०२ | ४२३२ | ५७० | ३४३ | ३०४ | ३८ | २८२ | ६६ |
| **एकूण . .** | **८४९४** | **७३८४** | **१११०** | **६०१** | **५२२** | **९४** | **४८४** | **१३०** |
| **बढती** | | | | | | | | |
| वर्ग-१ | ४३ | ३८ | ५ | ४ | ४ | ० | ४ | ० |
| वर्ग-२ | २३९ | २२३ | १६ | १८ | १८ | २ | १६ | १ |
| वर्ग-३ | १३९५ | १०७९ | ३१६ | १११ | ७६ | ३८ | ७२ | ३६ |
| वर्ग-४ | १४९५ | १०७६ | ४१९ | १०२ | ६९ | ३४ | ७९ | ३० |
| **एकूण . .** | **३१७२** | **२४१६** | **७५६** | **२३५** | **१६७** | **७४** | **१७१** | **६७** |
| **भरती + बढती एकवट** | **११६६६** | **९८००** | **१८६६** | **८३६** | **६८९** | **१६८** | **६५५** | **१९७** |

उक्त दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये सरळसेवा व पदोन्नतीने भरती करण्यात येणाऱ्या अनुसूचित जमातीच्या पदांचा दिनांक ३१ मे,२०१० अखेर शिल्लक असलेला अनुशेष मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्याबाबत त्वरित कार्यवाही करावी असे समितीने निदेश दिले. अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्याची प्रक्रिया सुरु आहे, असे आयुक्त यांनी समितीला सांगितले.

उपरोक्त लेखी स्वरुपात प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अनुकंपा तत्वावरील ११ सेवकांपैकी ३ सेवकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. ८ लोकांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. ८ उमेदवारांनी आतापर्यंत वैधता प्रमाणपत्र का सादर केले नाहीत, अशी समितीने पृच्छा केली असता, आयुक्त, महानगरपालिका यांनी अनुकंपा तत्वावरील हे उमेदवार आहेत. समितीचा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. चुकीच्या पध्दतीने हे लोक आले असतील तर ते पुढे तसेच राहू नयेत यासाठी त्यांच्याकडून वैधता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यांना निश्चित कालावधी देण्यात येईल असे समितीला सांगितले. अनुसूचित जमातीमध्ये ८४ जाती आहेत. त्यापैकी ते कोणत्या जातीचे आहेत, हे अनुकंपा तत्वावर लागलेले असतील तर ते ज्यांच्या जागेवर लागलेले आहेत ते कोणत्या जातीचे होते, अनुकंपा तत्वावरील आठ उमेदवारांची अद्याप जात पडताळणी का झालेली नाही, अशी समितीने पृच्छा केली. अनुकंपा तत्वावर ते ज्यांच्या जागेवर लागले आहेत ते कोणत्या जातीचे होते ते पहावे लागेल. या उमेदवारांचे वडील किंवा आई बिगारी कामगार होते ते सेवेत असताना मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांच्या पाल्यांना त्यांच्या जागेवर घेण्यात आलेले आहे. वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत त्यांना पत्र दिलेले आहे. आपली अनुकंपा तत्वावर अनुसूचित जमातीच्या कोट्यातून नियुक्ती झालेली आहे तेव्हा आपण ताबडतोब वैधता प्रमाणपत्र सादर करावे असे लिहिले होते अशी समितीला माहिती दिली. समितीने आता आजच्या तारखेला त्यांना पत्र लिहून दोन महिन्याची अंतिम मुदत देण्यात यावी. दोन महिन्याच्या आत त्यांच्याकडून वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तर आपली सेवा समाप्त होईल. तसेच आतापर्यंत आपल्या झालेल्या सेवेच्या कालावधीत आपण जो पगार घेतलेला आहे तो पगार इतर भत्यासहीत वसूल करण्यात येईल, असेही नमूद करण्यात यावे.

अभिप्राय व शिफारशी :-

**(१) पुणे महानगरपालिकेने अनुसूचित जमातीमधील शिल्लक असलेला अनुशेषाच्या पदाबाबत ऑगस्ट, २००९ मध्ये दिलेल्या जाहिरातीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जानुसार भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली. जाहिरातीनुसार महानगरपालिकेत मे, २०१० अखेर अनुसूचित जमातीच्या सरळसेवा भरती द्वारे वर्ग-३ मध्ये ६२ पदांचा व वर्ग-४ मध्ये ६६ पदांचा अनुशेष आहे. तसेच पदोन्नतीद्वारे वर्ग-३ मध्ये ३६ पदांचा व वर्ग-४ मध्ये ३० पदांचा अनुशेष शिल्लक आहे. समितीने दिलेल्या निदेशानुसार महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीच्या वर्ग-३ व ४ मध्ये शिल्लक असलेला अनुशेष तातडीने भरणेबाबत कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) समितीने दिलेल्या निदेशानुसार दोन महिन्याच्या कालावधीनंतर अनुकंपा तत्वावरील आठ उमेदवारांपैकी किती उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असून ते सेवेत आहेत आणि किती जणांना वैधता प्रमाणपत्र सादर न करता नोकरीवरुन काढण्यात आले, यासंबंधीची माहिती समितीला पाठविण्यात यावी असे समितीने निदेश दिले. उक्त दिलेल्या निदेशानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## पिंपरी -चिंचवड महानगरपालिका

**(पाच) अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचा असलेला अनुशेष व जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी बाबत कार्यवाही :-**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सरळ सेवा व पदोन्नतीने भरावयाच्या पदांचा वर्ग १ ते ४ मध्ये ४१ पदांचा अनुशेष आहे. जाहिरात दिल्यानंतर अनुसूचित जमातीचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत काय, अशी समितीने विचारणा केली असता सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगर-पालिका यांनी वर्ग १ मध्ये सरळ सेवेचा अनुशेष नाही मात्र पदोन्नतीमध्ये ३ पदांचा अनु.जमातीचा अनुशेष आहे. त्यात सहाय्यक आयुक्तांचे एक पद तसेच कार्यकारी अभियंता स्थापत्य व विद्युत यांचे प्रत्येकी १ पद रिक्त आहेत. यामध्ये खालच्या पदावर योग्य उमेदवार उपलब्ध नसल्याने सहा.आयुक्त व कार्यकारी अभियंता विद्युत ही पदे अनु.जमाती उमेदवारांतून भरता आली नाहीत आणि कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर ज्या खालच्या पदावरील व्यक्तीस पदोन्नती दिली होती त्यांचे जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांना पदावनत करण्यात आले त्यामुळे त्याही पदाचा अनुशेष आहे. मात्र येत्या ३-४ वर्षात खालच्या पदावरील उमेदवार उपलब्ध होऊन ही पदे निश्चितपणे पदोन्नतीने भरली जातील, या कार्यालयाने भरतीच्या प्रक्रियेमध्ये मागील दोन-तीन वर्षात मोठ्या प्रमाणात भरती केलेली आहे. त्यानुसार ६४२ पदे सरळ सेवेतून भरली आहेत आणि त्यात जवळपास ७३ उमेदवार अनु.जमातीचे आहेत. त्याशिवाय ३४९ पदे पदोन्नतीने भरलेली असून त्यामध्ये १८ पदे अनु.जमातीचे आहेत. या कार्यालयात सरळसेवा व पदोन्नतीने गेल्या २-४ वर्षात ९९१ पदे भरली आहेत त्यातील ९१ पदी अनु.जमातीचे उमेदवार आहेत. तसेच पुढील ३-४ वर्षामध्ये पदोन्नतीने भरावयाच्या पदांवर अनु.जमातीचे उमेदवार मिळू शकतील अशी आज स्थिती आहे. पदोन्नती मिळण्यासाठी जो ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा लागतो तो या लोकांकडे पुढील काही वर्षांनी पूर्ण होत असल्याने ते पदोन्नतीच्या पदांसाठी सहज उपलब्ध होऊ शकतील, असे समितीला सांगितले.

पदोन्नतीने भरावयाच्या पदासाठी ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. परंतु एखाद्या अनु.जमातीच्या खालच्या पदावरील व्यक्तीकडे ४ वर्षाचाच अनुभव असेल तर नियमात थोडी शिथिलता आणुन अनु.जमातीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी आपणास ते पद भरता येणार आहे काय, या कार्यालयाकडे एकूण ४१ जागा अनु.जमातीच्या रिक्त आहेत. तेव्हा रिक्त पदे लवकरात लवकर अनु.जमातीच्या उमेदवारातून भरण्याची कारवाई करावी, अशी पुन्हा पृच्छा केली असता सहायक आयुक्त, महानगरपालिका यांनी अनुभवाच्या नियमात शिथिलता देता येईल म्हणजे जेथे एखाद्या वर्षाचा अनुभव कमी असल्यास नियमात शिथिलता आणून आपल्याला बढती देता येऊ शकते.मात्र त्यासाठी शासनाची परवानगी असणेही आवश्यक आहे. यापूर्वीच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये देखील अशी तरतूद होती की, जेव्हा अशा प्रकारे एखाद्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होत नसतील तर दुसऱ्या प्रवर्गातून म्हणजे अनु.जमातीचे उमेदवार मिळत नसतील तर अनु.जातीचे उमेदवार भरावेत, असे सांगण्यात आलेले आहे.

वर्ग ३ ची ४१ पदे रिक्त दाखविली आहेत. त्याची कारणे म्हणून आपण "काही पदांसाठी कर्मचारी उपलब्ध होत नाही" असे म्हटले आहे, याबाबत अधिक खुलासा करावा अशी समितीने पृच्छा केली त्यावर सहायक आयुक्त, महानगरपालिका यांनी वाहन चालक या पदाचा १ चा अनुशेष दाखविला आहे. स्टाफ नर्सचा अनुशेष ७ दाखविला आहे. नव्याने निर्माण झालेला अनुशेष यामध्ये सन २००६ मध्ये या कार्यालयाकडील रोस्टरची तपासणी आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाकडून झाली त्यावेळी तो निदर्शनास आला आहे. यापूर्वी १९९४,१९९९ पर्यंत आपण हे ओबीसीचे एक पद मानत होतो. पण २००६ मध्ये बिंदुनामावलीची (रोस्टर) तपासणी झाली त्यामध्ये हा नव्याने अनुशेष दाखविला गेला आहे. पुढील भरतीमध्ये हा अनुशेष राहणार नाही यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील, असे समितीला सांगितले. बिंदुनामावलीची (रोस्टर) तपासणीनंतर हा अनुशेष असल्याचे या कार्यालयाच्या लक्षात आले, म्हणजे २००६ पासून हे पद रिक्त आहे. रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न नंतरच्या दोन तीन वर्षात का करण्यात आले नाही, उमेदवार उपलब्ध नाही असे ज्या ज्या पदांच्याबाबतीत आपण म्हटलेले आहे ती पदे किती वर्षापासून रिक्त आहेत वा तो अनुशेष किती वर्षापासूनचा आहे, अशी समितीने पुन्हा विचारणा केली, त्यावर सहायक आयुक्त यांनी या कार्यालयाकडे असलेली ४ पदे त्यापूर्वीच भरली गेली आहे. नंतर आता त्यातील एखादे पद रिक्त झाल्याशिवाय भरता येत नाही असे समितीला सांगितले.

महानगरपालिकेत संवर्गनिहाय अनु.जमातीचा अनुशेष किती आहे अशी पुन्हा विचारणा केली, सहायक आयुक्त यांनी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाची एकूण १३९ पदे मंजूर असून त्यापैकी ११९ पदे भरलेली आहेत आणि २० पदे रिक्त आहेत. यामध्ये अनुसूचित जमातीसाठी १० पदे असून, दोन पदे भरलेली आहेत आणि ८ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. लिपिकाची एकूण १७४ पदे मंजूर असून, त्यामध्ये २५ टक्के पदे ही पदोन्नतीने भरली जातात सद्य:स्थितीत लिपिक संवर्गात १२ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये एकूण १७४ पदे लिपीकाची असताना सुध्दा १९९६-१९९७ मध्ये २०३ उमेदवारांना पदोन्नती दिली होती. असे समितीला सांगितले. अशाप्रकारे उमेदवारांना पदोन्नती दिल्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. मागासवर्गीयांना डावलून अन्य उमेदवारांना पदोन्नती दिलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमानुसार पदोन्नती दिलेली नाही. या विषयाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य तो मार्ग काढून अनुसूचित जमातीची पदे भरण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे समितीचे मत आहे, या संदर्भात आपण कोणत्या प्रकारे मार्ग काढणार आहात, अशी समितीने विचारणा केली असता सहायक आयुक्त यांनी सदर पदे भरण्याच्या संदर्भात शासनाकडे मागणी करण्यात येणार आहे. असे समितीला सांगितले तसेच मजुराची १११५ पदे मंजूर आहेत त्यातील ८७५ पदे भरण्यात आलेली आहेत. २४० पदे रिक्त आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली एकूण-७८ पदे मंजूर असून, त्यापैकी ४४ पदे भरलेली आहेत आणि ३४ पदांचा अनुशेष दाखविण्यात आलेला आहे. तसेच शिपायाची एकूण ४८१ पदे आहेत. त्यातील ४०० पदे भरण्यात आलेली असून, ८१ पदांचा अनुशेष दाखविण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी शिपायाची एकूण ३४ पदे असून, १९ पदे भरण्यात आलेली आहेत आणि १५ पदांचा अनुशेष

दाखविण्यात आलेला आहे. यामध्ये संवर्गनिहाय अनुसूचित जमातीचा अनुशेष दाखविण्यात आलेला असून ही पदे न भरण्याची कारणे काय, अनुसूचित जमातीसाठी असणारी शिपाई आणि मजुराची पदे एवढ्या मोठ्या प्रमाणात रिक्त राहण्याची कारणे काय आहेत, अनुसूचित जमातीची जेवढी मंजूर पदे आहेत त्यामध्ये दुसऱ्या संवर्गातील कर्मचारी काम करीत असल्यामुळे सदर पदे भरण्यात आलेली नाहीत. पीसीएमटी आणि पीएमटी या दोन वेगवेगळ्या आस्थापना आहेत. या भरती प्रक्रियेमध्ये इतर संवर्गातील उमेदवारांना पदोन्नती दिल्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे, शासन निर्णयाप्रमाणे मागासवर्गीयांची पदे प्राधान्याने भरली गेली पाहिजेत, अशा प्रकराचे निर्देश असतांना महानगरपालिकेने इतर उमेदवारांची पदे भरलेली असल्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे यासंदर्भात तीन महिन्यात योग्य तो निर्णय घेऊन अनुसूचित जमातीची रिक्त असणारी पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. असे समितीने निदेश दिले. त्यावर आयुक्त, महानगरपालिका यांनी असे समितीला आश्वासित केले की, या विषयाच्या संदर्भात तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत झालेल्या बैठकीच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने **दिनांक ४ जून, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.** साक्षीच्यावेळी समितीला अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची भरती / बढती अनुशेष इत्यादीबाबत खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात आली.—

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भरण्यात आलेली पदे**

**सरळसेवाव्दारे भरण्यात आलेली पदे**

| अ.क्र. | वर्ग | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर पदांवर आवश्यक आरक्षण अ.ज. | भरलेल्या पदांची वर्गवारी अ.ज. | अनुशेष अ.ज. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | १ | वर्ग १ | ११ | १० | १ | ० | ० | ० | |
| २ | २ | वर्ग २ | ८२ | ५८ | २४ | ६ | ५ | १ | |
| ३ | ३ | वर्ग ३ | २६६४ | २२१८ | ४४६ | १९० | १३९ | ५२ | |
| ४ | ४ | वर्ग ४ | २६४२ | २१७४ | ४६८ | १८७ | १३२ | ५५ | |
| | | **एकूण . .** | **५३९९** | **४४६०** | **९३९** | **३८३** | **२७६** | **१०८** | |

एलबी-९८५०-३

## पदोन्नतीव्दारे भरण्यात आलेली पदे

| अ.क्र. | वर्ग | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर पदांवर आवश्यक आरक्षण अ.ज. | भरलेल्या पदांची वर्गवारी अ.ज. | अनुशेष अ.ज. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | १ | वर्ग १ | ६३ | ४३ | २० | ३ | २ | १ | |
| २ | २ | वर्ग २ | १३५ | ११६ | १९ | १० | ९ | २ | |
| ३ | ३ | वर्ग ३ | ८९५ | ८१८ | ९९ | ६४ | ४६ | २३ | |
| ४ | ४ | वर्ग ४ | १५४ | ११८ | ३६ | ११ | ५ | ६ | |
| | | **एकूण . .** | **१२४७** | **१०९५** | **१७४** | **८८** | **६२** | **३२** | |

महानगर पालिकेतील अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना नोटिसा देऊन जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविले आहे एकूण अनुसूचित जमातीचे वर्ग १ ते ४ वर्गातील ३५० अधिकारी/ कर्मचारी असून २७४ अधिकारी/ कर्मचारी यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे. उर्वरीत ७६ अधिकारी / कर्मचारी यांचेपैकी ११ अधिकारी / कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्रे समितीने अवैध ठरविलेली असून त्यांचे विरुध्द कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. (संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांची नावे सोबतच्या तक्त्यात दिली आहे) उर्वरीत प्रकरणामध्ये समितीने निर्णय दिल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र. | वर्ग | दि.३१-१२-२००९ अखेर भरलेली एकूण पदे | वैधता प्रमाणपत्र असलेले कर्मचारी | वैधता प्रमाणपत्र प्रलंबीत कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | . . | १ | ०१ | ० |
| २ | २ | १५ | १२ | ३ |
| ३ | ३ | १९० | १५८ | ३२ |
| ४ | ४ | १४४ | १०३ | ४१ |
| **एकूण** | . . | **३५०** | **२७४** | **७६** |

**अनुसूचित जमाती कर्मचारी यांच्या जातीच्या वैधतेबाबत तपशीलवार माहिती :**

| वर्ग | एकूण अ.ज. कर्मचारी | वैधता असलेले | वैधता नसलेले (अवैध) | समितीकडे पाठविलेले | समितीकडे न पाठविलेले | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| २ | १५ | १२ | १ | ० | १ | १ (श्री.तीरुमनी OBC चे प्रमाणपत्र) |
| ३ | १९० | १५८ | ५ | ७ | १५ | ५ |
| ४ | १४४ | १०३ | ५ | १२ | २१ | ३ |
| **एकूण** | **३५०** | **२७४** | **११** | **१९** | **३७** | **९** |

सेवेत दाखल झालेले परंतु जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविणेत आलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक १५-०६-१९९५ नंतर समाप्त करणेत आली आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना त्यापुर्वी जी पदोन्नती दिली आहे, अशा कर्मचाऱ्यांना पदावनत करणेत आलेले आहे.

**अनुसूचित जमातीचा दाखला अवैध झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती**

| अ.क्र | नाव | पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. खामकर अनिल लक्ष्मण | लेखाधिकारी | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| २ | श्री. गायकवाड कैलास सुदाम | लिपिक | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| ३ | श्री. चौरघे सुरेश गेनबा | वाहन चालक | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| ४ | श्री. लिमजे मनोज मारुती | वीजतंत्री | सन २००४ मध्ये वीजपर्यवेक्षक पदावरुन पदावनत केले आहे. |
| ५ | श्री. पवार वाल्मिकी गेनबा | क्रीडा शिक्षक | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| ६ | श्री. पांढरे वैजनाथ प्रल्हाद | स्थापत्य अभि-यांत्रिकी सहायक | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| ७ | श्री. बारगे सदाशिव दगडू | मजूर | कार्यवाही कार्यान्वित आहे. |

**अनुसूचित जमातीचा दाखला अवैध झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती** : चालू

| अ.क्र | नाव | पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| ८ | श्री. ढगारे हेमंत दत्तात्रय | मजूर | सन २००८ मध्ये मुकादम पदावरुन पदावनत केले आहे. |
| ९ | श्री. राऊत दिलीप भगवान | शिपाई | सन २००८ मध्ये मुकादम पदावरुन पदावनत केले आहे. |
| १० | श्री. कारकूड अरविंद संपत | शिपाई | कार्यवाही कार्यान्वित आहे. |
| ११ | श्रीमती वाळेकर वंदना गोविंद | आया | कार्यवाही कार्यान्वित आहे. |

उपरोक्त माहितीच्या आधारे साक्षीच्या वेळी अनुसूचित जमातीच्या भरतीसंदर्भात बहुतेक नगरपालिका किंवा महानगरपालिकेकडून सांगितले जाते की, अनुसूचित जमातीचा उमेदवार उपलब्ध होत नाही. नगरपरिषदेमध्ये भरती प्रक्रिया राबविताना नगर विकास विभागाने स्पष्टपणे आदेश काढले पाहिजेत की, बिंदू नामावलीप्रमाणे पदांना मंजुरी घेऊन, अनुसूचित जमातीच्या जागा भरल्याशिवाय इतर पदे भरु नयेत. अनुसूचित जमातीची पदे शासन निर्णयानुसार भरली नाही तर नगरपरिषदेचे अनुदान थांबविण्यात येईल असे सर्व नगरपरिषद/महानगरपालिकांना कळवावयास पाहिजे. वास्तविक पाहता सामान्य प्रशासन विभागाने योग्य ती कार्यवाही केल्याशिवाय नगर परिषद व महानगरपालिकेमध्ये आवश्यक ती पदे भरणे शक्य नाही. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागानेच उचित ती कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. असे समितीने मत व्यक्त केले. प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग यांनी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अनुषंगाने, या महानगरपालिकेतील **वर्ग-३ मध्ये अनुसूचित जमातीतील ५२ पदांचा व वर्ग-४ मध्ये ५५ पदांचा अनुशेष आहे**. अशाप्रकारे वर्ग- ३ व ४ मध्ये एकूण १०७ पदांचा सरळ सेवेमध्ये अनुशेष आहे. तसेच **पदोन्नतीमध्ये ३२ पदांचा अनुशेष आहे**. अनेकदा नगरपरिषदा/महानगरपालिका यांच्याकडून शासन स्तरावर कळविले जाते की, अनुसूचित जमातीचा उमेदवार मिळत नसल्यामुळे आम्हाला खुल्या प्रवर्गातून पदे भरण्यास परवानगी द्यावी. तथापि, यापुढे अशा प्रकारची परवानगी दिली जाणार नाही.

तसेच वर्ग १ ते ४ मध्ये ३५० अधिकारी/कर्मचारी असून २७४ अधिकारी/कर्मचारी यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे. ११ अधिकारी/कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्र समितीने अवैध ठरविले असून त्यांचे विरुध्द कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे आणि १९ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेली आहेत. जात पडताळणी समितीने एखाद्या कर्मचाऱ्यांस अवैध ठरविल्यानंतर त्यांच्या विरुध्द कारवाई सुरु करण्यात आली आहे काय,

ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे अशा वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात आले आहे काय, अशी समितीने पृच्छा केली त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील दि. १५-६-१९९५ नंतर सेवेत दाखल झालेल्या तीन कर्मचाऱ्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले आहे. उर्वरित ११ कर्मचारी राहिले आहेत. त्यांच्यापैकी ४ अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत केलेले आहे.

अनुसूचित जमातीच्या ज्या कर्मचाऱ्यांनी वा अधिकाऱ्यांनी अवैध प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत त्यासंबंधीची माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच वर्ग-३ मध्ये "उमेदवार उपलब्ध झाला नाही" असा उल्लेख ४१ पदांच्या बाबतीत करण्यात आलेला आहे. यासंबंधीची सद्यस्थिती काय आहे, अशी समितीने पृच्छा केली असता, आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी गेल्या तीन वर्षात अनुसूचित जमातीचे १२० उमेदवार भरण्यात आले आहेत. ४१ पदे भरावयाची बाकी आहेत. आठ पदांसाठी नुकतीच जाहिरात दिली आहे आणि त्या पदासाठी मुलाखती सुरु आहेत. १६ पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. स्टाफ नर्स, फार्मासिस्ट, लॅब टेकनिशिअन इत्यादी दहा पदासाठी उमेदवार मिळत नाहीत. असे समितीस सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

**(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सरळसेवा व पदोन्नतीने एकूण ९९१ पदे भरली आहेत. त्यापैकी ६४२ पदे सरळ सेवेतून भरलेली असून त्यामध्ये अनुसूचित जमातीची ७३ पदे आहे. तसेच ३४९ पदे पदोन्नतीने भरलेली असून त्यामध्ये १८ पदे अनुसूचित जमातीची आहेत. अनुसूचित जमातीचा अनुशेष दाखविण्यात आलेल्या पदांमध्ये, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ८ पदांचा अनुशेष, लिपिक संवर्गात १२ पदांचा अनुशेष, मजूराच्या भरण्यात आलेल्या पदांमध्ये ३४ पदांचा अनुशेष व शिपाई संवर्गात १५ पदांचा अनुशेष शिल्लक आहे असे समितीच्या बैठकीच्या वेळी निदर्शनास आले. महानगरपालिकेतील भरती प्रक्रियेमध्ये इतर संवर्गातील उमेदवारांना पदोन्नती दिल्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. यासंदर्भात योग्य तो निर्णय घेऊन अनुसूचित जमातीची रिक्त असणारी पदे भरण्याची त्वरीत कार्यवाही करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. साक्षीच्यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत अनुसूचित जमातीतील सरळसेवेने वर्ग-३ मध्ये ५२ पदे व वर्ग-४ मध्ये ५५ पदांचा अनुशेष आणि पदोन्नतीने वर्ग-३ मध्ये २३ व वर्ग-४ मध्ये ६ पदांचा अनुशेष आहे. असा एकूण अनुसूचित जमातीचा सरळ सेवा व पदोन्नतीने वर्ग-३ व ४ मध्ये दाखविण्यात आलेल्या १३६ पदांच्या अनुशेषापैकी अनुसूचित जमातीचे भरण्यात आलेले १२० उमेदवार संवर्गनिहाय**

(पदनामासह) कोणकोणत्या वर्गात भरती करण्यात आले आहे, भरती करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल व वर्ग-३ व ४ मध्ये अनुसूचित जमातीचा शिल्लक असलेला अनुशेष भरणेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन माहिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीच्या वर्ग १ ते ४ मधील ३५० अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी २७४ अधिकारी/कर्मचारी यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे. उर्वरित ७६ अधिकारी/कर्मचारी यांचे पैकी ११ कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्रे समितीने अवैध ठरविलेले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन निर्णयानुसार करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल तसेच अवैध ठरविण्यात आलेल्या ११ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात आले आहे. पदावनत करण्यात आलेले ४ कर्मचारी १९९५ नंतर सेवेत लागलेले असल्याने नियुक्तीचेवेळी त्यांच्याकडून अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र न घेता त्यांना कोणत्या आधारे सेवेत समाविष्ट करुन घेण्यात आले याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा माहितीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

(३) महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीचा अधिकारी व कर्मचारी वर्गाची जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या १९ प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टिने कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र तपासणीस विलंब होत असल्यास त्यांच्याकडून होणा-या विलंबाबाबतच्या कारणासह केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

वरिलप्रमाणे समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या माहितीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट

## बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## पहिली बैठक

## रविवार, दिनांक ६ जुलै, २००८

समितीची बैठक सावंतवाडी नगरपरिषद कार्यालय येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :---

**उपस्थिती :**

(१) डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

(३) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. डी. पी. येवला, कक्ष अधिकारी.

**सावंतवाडी नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी वर्ग :**

(१) श्रीमती पल्लवी दी. केसरकर, उपनगराध्यक्षा.

(२) श्री. हरिहर राजोपाध्ये, मुख्याधिकारी, सावंतवाडी नगरपरिषद.

(३) श्री. एम.एन.शिरसाट, प्रकल्प अधिकारी, पेण.

(४) श्री. एन.व्ही. पाटील, सहायक प्रकल्प अधिकारी, पेण.

समितीने या बैठकीत नगरपालिका कार्यालय, सावंतवाडी येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबतचा आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## दुसरी बैठक

## गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २००८

समितीची बैठक अलिबाग नगरपरिषद कार्यालय येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. महादू नागो बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री. रमेश चौधरी, वि.स.स.
(३) श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.
(४) डॉ. संदिप धुर्वे, वि.स.स.
(५) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
(६) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. दिलीप येवला, कक्ष अधिकारी.

**अलिबाग नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी वर्ग :-**

(१). श्री. राजेंद्र चव्हाण, प्रभारी मुख्याधिकारी, नगरपरिषद, अलिबाग.
(२) श्री. व्ही. पी. नाईक, सहा.कार्या. निरीक्षक.
(३) श्री. एम. एन. शिरसाट, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प, पेण. जि.रायगड.
(४) श्री. बी. जी. कुरळे, गट विकास अधिकारी, ता.सुधागड.
(५). श्री. एस. के. आडे, नियोजन अधिकारी.
(६) श्री. आर. डी. जोशी,उप अभियंता.
(७) श्री. एम. बी. टाकणे, शाखा अभियंता.

समितीने या बैठकीत नगरपरिषद कार्यालय अलिबाग येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबतचा आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## तिसरी बैठक
## मंगळवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २००८

समितीची बैठक भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालय येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. महादू नागो बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री. रमेश चौधरी, वि.स.स.
(३) श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.
(४) श्री. राजाराम ओझरे,वि.स.स.
(५) श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.
(६) डॉ. संदिप धुर्वे, वि.स.स.
(७) श्री. एम. एम.शेख, वि.प.स.
(८) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. व्ही. डी. जोशी, उप सचिव.
(२) श्री. ए. आर. पिंपळे, अवर सचिव.

**भिवंडी-निजामपूर महानगरपालिका :**

(१) श्री. दळवी जावेद गुलाम मोह., महापौर.
(२) श्री. जास्वंदी अशोक पाटील, उपमहापौर.
(३) श्री. खलीद बक्कन, स्थायी समिती सभापती.
(४) श्री. प्रकाश बोरसे, आयुक्त, महानगरपालिका.
(५) श्री. भालचंद्र गोसावी, उप आयुक्त (मुख्य).
(६) श्री. टी. आर. लवंगारे, उप आयुक्त (कर).
(७) श्री. एम. एन. पाटील, मुख्य लेखाधिकारी.
(८) श्री. आर. बी. थोरात, मागासवर्ग कक्ष प्रमुख.
(९) श्री. एन. टी. पाटील, शहर अभियंता.

**आदिवासी विकास विभाग :**

श्री. नामदेव पाटील, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

**आयुक्त कार्यालय :**

श्री. किशोर तावडे, सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, कोकणभवन.

समितीने या बैठकीत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालय येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमाती करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

**चौथी बैठक**

**शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २००९**

समितीची बैठक पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यालय येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. महादू नागो बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

(३) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(४) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

(५) श्री. दिलीपराव सोनावणे,वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(२) श्री. एल. एन. जाधव, समिती अधिकारी.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्रीमती स्नेहल बर्गे, सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

(२) श्री. प्रकाश भालेराव, नायब तहसीलदार, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

**प्रकल्प अधिकारी कार्यालय, खेड, पुणे:**

श्री. लोमेश सलामे, प्रकल्प अधिकारी,घोडेगांव.

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी वर्ग :**

(१) श्री.आशीष शर्मा, आयुक्त, पिंपरी-चिंचवड, म.न.पा.

(२) श्री.सुभाष डुंबरे, अति.आयुक्त, पिंपरी-चिंचवड, म.न.पा.

(३) श्री. सुधाकर देशमुख, सहा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड, म.न.पा.

समितीने या बैठकीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यालय येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

**पाचवी बैठक**

**मंगळवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २००९**

समितीची बैठक पुणे महानगरपालिका (महात्मा फुले सभागृह), पुणे येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री.महादू नागो बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री.सुरेश इंगळे, वि.स.स.

(३) श्री.राजकुमार पटेल, वि.स.स.

(४) श्री.दिलीपराव सोनावणे, वि.प.स.

(५) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(२) श्री. एल. एन. जाधव, समिती अधिकारी.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे:**

(१) श्रीमती स्नेहल बर्गे, सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

(२) श्री. प्रकाश भालेराव, नायब तहसीलदार, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

**आदिवासी विकास विभाग :**

श्री. लोमेश सलामे, प्रकल्प अधिकारी,घोडेगांव.

**पुणे महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी वर्ग :**

(१) श्री. उमाकांत दांगट, अतिरिक्त आयुक्त (विशेष).

(२) श्री. मच्छिंद्र देवणीकर, अतिरिक्त आयुक्त (जनरल).

(३) श्री. अशोक कळमकर, सह आयुक्त (ना.वि.यो.).

(४) श्री. सुरेश जगताप, उप आयुक्त.

(५) श्री. लक्ष्मण डामसे, उप आयुक्त.

(६) श्री. प्रविण अष्टेकर, विशेष कार्याधिकारी.

(७) श्री. शिवाजी दौंडकर, सेवकवर्ग विभाग अधिकारी.

(८) श्री. संजय मोरे, जनसंपर्क अधिकारी.

(९) श्रीमती कळसकर, जनसंपर्क अधिकारी.

(१०) श्रीमती केदारी, विभाग प्रमुख.

समितीने या बैठकीत पुणे महानगरपालिका कार्यालय येथे भेट दिली. या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमाती करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## सहावी बैठक

## शुक्रवार, दिनांक ४ जून, २०१०

समितीची बैठक विधानभवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता घेण्यात आली होती. सदरहू बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(४) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(५) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(६) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(७) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(८) श्री. रमेश शेंडगे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(२) श्री. एल. एन. जाधव, अवर सचिव (समिती).

**विभागीय सचिव व संबंधित अधिकारी :**

(१) डॉ. पी. एस. मीना, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सा.वि.स.) व विशेष चौकशी अधिकारी.

(२) श्री. उत्तम खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

(३) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग (२).

(४) श्री. राजीव जाधव, संचालक, नगर परिषद संचालनालय.

(५) श्री. महेश झगडे, आयुक्त, पुणे महानगरपालिका.

(६) श्री. आशिष शर्मा, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

(७) श्री. सुभाष डुंबरे, अति. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

(८) श्री. उमाकांत दांगट, अति. आयुक्त, पुणे महानगरपालिका.

(९) श्री. म. प्र. सिंह, सह सचिव, आदिवासी विकास विभाग.

(१०) श्री. के. व्ही. कुरुंदकर, उप सचिव, नगर विकास विभाग.

(११) श्री. श्रीवास्तव, आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, भिंवडी.

(१२) श्री. नितीन नार्वेकर, मुख्याधिकारी, सावंतवाडी नगरपालिका.

(१३) श्री. विठ्ठल ढोके, मुख्याधिकारी, अलिबाग नगरपालिका.

समितीने या बैठकीत सावंतवाडी नगरपरिषद, अलिबाग नगरपरिषद, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी जमातीकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## सातवी बैठक

समितीची बैठक बुधवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१० रोजी दुपारी १.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.—

**उपस्थिती :**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(४) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(५) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(६) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(७) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(२) श्री. एल. एन. जाधव, अवर सचिव (समिती).

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

शासकीय मुद्रणालय, नागपुर